RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : दिपक मोरेश्वर नाईक
○कार्यकरी संपादक : श्री विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०२ ● अंक-३३६ ● मुंबई, शुक्रवार ०७ जूलै २०२३ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ' लक्षवेधी '

### २४ तासांमध्ये खड्डे निकालात

**नवी मुंबई,** पावसाळा सुरू झाल्यानंतर रस्त्यावर खड्डे पडणे, हे एक समीकरणच झाले आहे. मात्र, यंदा नवी मुंबई शहर याला अपवाद राहणार आहे. कारण शहरातील रस्त्यांवर पडणारे खड्डे तत्काळ बुजवण्यासाठी महापालिकेने नोडनिहाय कंत्राटदार नियुक्त केले आहेत. या कंत्राटदारांना २४ तासांमध्ये दुरुस्तीचे आदेश असल्याने यंदा पावसाळ्यात खड्डेमुक्त रस्त्यांची हमी महापालिकेने दिली आहे. नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत बेलापूर ते दिघापर्यंत सुमारे ५०५ किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांची देखभाल, तसेच दुरुस्ती महापालिकेतर्फे केली जाते. शहरातील बहुतांश रस्ते हे डांबरीकरणाने व्यापलेले आहेत. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिका रस्त्यांची दुरुस्तीची कामे हाती घेते. त्यामुळेच इतर शहरांच्या तुलनेत पावसाळ्यात नवी मुंबईतील अंतर्गत रस्त्यांवर खड्ड्यांची ओरड कमी असते. मात्र, सिडको काळातील जुन्या रस्त्यांवर पावसाळ्यात खड्डे पडत असल्याने महापालिकेने बेलापूर, नेरूळ, तुर्भे, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा, महापे एमआयडीसी आणि नेरूळ एमआयडीसी अशा विविध भागांत खड्डे बुजवण्यासाठी कंत्राटदारांची नियुक्ती केली आहे. या कंत्राटदारांना नोडमध्ये रस्त्यावर फिरते पथक ठेवून नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने तत्काळ खड्डे बुजवण्याचे आदेश आहेत. त्यामुळे यंदा पावसाळ्यात खड्डेमुक्त प्रवास नवी मुंबईकरांना अनुभवायला मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. खड्डे बुजवण्यासाठी महापालिकेने नियुक्त केलेल्या नोडनिहाय कंत्राटदारांना दंडाची तरतूद केली आहे. खड्डे पडल्याची तक्रार केल्यापासून २४ तासांच्या आत खड्डे बुजवले नाही तर कंत्राटदाराला एका खड्ड्यामागे १२०० रुपयांचा दंड ठोठावला जाणार आहे. त्यामुळे कंत्राटदारही तक्रारीनंतर तत्काळ प्रतिसाद देत आहेत. नवी मुंबई शहरात एकूण ५०५ किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. त्यापैकी १०८ किलोमीटर लांबीचे रस्ते काँक्रिटचे आहेत, तर उर्वरित १३६ किलोमीटर लांबीचे रस्ते एमआयडीसी परिसरातील आहेत. यातील ३६ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा विकास एमआयडीसी करीत आहे. उर्वरित रस्त्यांवर एमआयडीसीमध्ये महापालिकेने १५ किलो मीटरचे नवीन रस्ते तयार केले आहेत. त्यावर अलिकडेच २९० कोटींचे रस्ते तयार करण्याचे काम सुरू आहे.

### डहाणूत पुन्हा भूकंपाचा धक्का

**कासा,** डहाणू तालुक्यात पुन्हा एकदा भूकंपाचा सौम्य धक्का जाणवल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. बुधवारी रात्री साडेदहा वाजता हा धक्का जाणवला. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या अनेक दिवसांपासून तालुक्याला भूकंपाचा धक्का जाणवला नव्हता. मात्र एकीकडे जोरदार पावसाला सुरुवात झाली असून भूकंपाचे धक्के सुरू झाल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. डहाणू, तलासरी तालुक्यातील अनेक गावांत हा धक्का जाणवला. यावेळी २.३ रिश्टर स्केलची नोंद झाली असल्याची माहिती डहाणू तालुका तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी दिली. यामुळे शासनाकडून याची सखोल चौकशी होऊन भविष्यात एखादी दुर्घटना घडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच आपत्कालीन विभाग सज्ज ठेवला पाहिजे, असे सांगण्यात येत आहे.

### मिरा-भाईंदर राष्ट्रवादी अजित पवार यांच्यासोबत

**भाईंदर,** मिरा-भाईंदर राष्ट्रवादी काँग्रेसमधील बहुतांश पदाधिकारी अजित पवार गटात सामील झाले आहेत. अल्पसंख्याक सेलच्या जिल्हाध्यक्षांनी मात्र शरद पवार यांच्यासोबतच राहण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर मिरा-भाईंदर राष्ट्रवादी कोणासोबत जाणार, याबद्दल कुतूहल निर्माण झाले होते. अजित पवार यांनी ज्या दिवशी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्याच दिवशी राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव आसिफ शेख यांनी अजित पवार यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. त्यापाठोपाठ मिरा-भाईंदर राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष अनु पाटीलदेखील अजित पवार गटात सहभागी झाल्या. मिरा-भाईंदरचे माजी जिल्हाध्यक्ष अरुण कदम यांनीदेखील अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना आपले समर्थन दिले. राष्ट्रवादीचे विद्यमान जिल्हाध्यक्ष मोहन पाटील मात्र दोलायमान स्थितीत होते; मात्र कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर तेदेखील बुधवारी सायंकाळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष साजिद पटेल यांच्यासह अजित पावर गटात सामील झाले. आतापर्यंत अजित पावर गटात सहभागी झालेले सर्व पदाधिकारी हे आनंद परांजपे यांच्या संपर्कातील पदाधिकारी आहेत. राष्ट्रवादीचे मिरा-भाईंदरमधील आणखी एक प्रदेश सचिव अकंश मालुसरे व अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष गुलाम नबी फारुकी यांनी मात्र राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबतच राहण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पावर हे धर्मनिरपेक्ष विचारांचे असल्यामुळे आपण त्यांच्यासोबत असल्याचे फारुकी यांनी सांगितले.

# अजित पवार गटाविरोधात थेट निलंबनाची कारवाई

### काय ठरलं राष्ट्रवादीच्या बैठकीत?



वर्किंग कमिटीच्या बैठकीशिवाय घेतलेला कोणताही निर्णय ग्राह्य धरला जात नाही. राष्ट्रवादीची घटना निवडणूक आयोगानं ग्राह्य धरलेली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या घटनेवर आक्षेप घेता येणार नाही असी चर्चा शरद पवारांच्या बैठकीत झाली. सुनिल तटकरे, प्रफुल पटेल, एस आर कोहली यांना पक्षातून निलंबित करण्याचा ठराव देखील या बैठकीत मंजूर करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळली आहे. राष्ट्रवादीच्या वर्किंग कमिटीत एकूण २५ सदस्य असून या बैठकीला २१ सदस्य हजर असल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

### खरी राष्ट्रवादी कोणाची याचा फैसला निवडणूक आयोग करणार



**■मुंबई। प्रतिनिधी,**
शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी पक्ष देखील फुटला आहे. यामुळे राज्यात मोठा राजकीय भूकंप आला आहे. राष्ट्रवादी पक्षात उभी फूट पडली असून शरद पवार आणि अजित पवार असे दोन गट झाले आहेत. अजित पवार यांनी थेट राष्ट्रवादी पक्षावर दावा करत राष्ट्रवादीची नवी संघटनात्मक कार्यकारिणी जाहीर करत शरद पवार यांना थेट आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे. तर, दुसरीकडे शरद पवार गटाने देखील कायदेशीर लढाईची तयारी सुरु केली आहे. शरद पवार यांनी दिल्लीतील बैठकीत अजित पवार गटाविरोधात मोठ डाव रचला आहे. अजित पवार गटाच्या नेत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यावर दिल्लीत शरद पवार राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक घेत आहेत. बैठकीला सुरूवात झाली आहे. शरद पवारांसोबत सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड, खासदार, श्रीनिवास पाटील, खासदार फौजिया खान, खासदार मोहम्मद फैजल, खासदार वंदना चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी या बैठकीला हजर आहेत.

(उर्वरीत पान २ वर)

### अजित पवारांना पक्षावर दावा करता येणार नाही, कारण, घटनातज्ञ उल्हास बापट यांचं मोठं विधान



**■मुंबई। प्रतिनिधी,**
अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंडखोरी केल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभाग घेतला. तसेच निवडणूक आयोगाकडे जात थेट राष्ट्रवादी पक्षाचं अध्यक्षपद, पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह असं सगळ्यावरच दावा केला. यामुळे तर्कवितर्कांना उधाण आलं आहे.

शिवसेनेनंतर आता राष्ट्रवादी पक्षावर हक्क कुणाचा हा वाद आयोगाकडे गेल्याने पुढे काय होणार याविषयी चर्चा सुरू आहेत. त्यावर घटनातज्ञ उल्हास बापट यांनी प्रतिक्रिया देत कायदेशीर बाजू सांगितली आहे. ते गुरुवारी (६ जुलै) दिलेल्या प्रतिक्रियेत बोलत होते.


उल्हास बापट म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी करणाऱ्या अजित पवार गटाचा दावा आहे की, त्यांच्याकडे विधीमंडळात बहुमत आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात सांगितलं आहे की, खरा पक्ष वेगळा आणि विधीमंडळ पक्ष वेगळा. त्यामुळे खरा पक्ष शरद पवारांकडे आहे आणि विधीमंडळ पक्ष अर्थात अजित पवारांकडे आहे. आता कुठला पक्ष खरा हा निर्णय निवडणूक आयोगाला घ्यावा लागेल. अजित पवारांनी आपणच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा दावा करण्याला काहीही अर्थ नाही.

(उर्वरीत पान २ वर)

### शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची सारखीच अवस्था!

**■मुंबई। प्रतिनिधी,**
एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना जसे दिव्यातून जावे लागले तशीच काहीशी अवस्था पुतण्याच्या बंडाने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची झाली आहे. अजित पवार, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ यांच्यासारखे अत्यंत जवळचे सहकारी आता शरद पवार यांना लक्ष्य करू लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रसच्या दोन्ही गटांच्या मेळाव्यात परस्परांना लक्ष्य करण्यात आले.

विशेष म्हणजे अजित पवार, छगन भुजबळ वा प्रफुल्ल पटेल या नेत्यांनी शरद पवार यांच्यावर टीकाटिप्पणी केली. पटेल हे तर अगदी गेल्या आठवड्यापर्यंत पवारांची सावली सारखे वावरत होते. पटेल यांनीही पवारांनावर आखपाखड केली. ह्यमी पुस्तक लिहिणार आहे. त्यातील तपशील वाचून अनेकांना धक्का बसेलह्ह हे पटेल यांचे विधान पवारांना उद्देशून होते. छगन भुजबळ यांनीही पवारांनी पक्षाच्या नेत्यांना तोंडघशी पाडल्याचा सूर लावला. भाजपबरोबर जाण्यात वावगे काय, असा सवालही केला.



(उर्वरीत पान २ वर)

### अजित पवारांना सत्तेत सहभागी करताना विश्वासात घेतलं का?

#### शिंदेंनी स्पष्टच सांगितलं, म्हणाले फडणवीस आणि इतर वरिष्ठ...

**■मुंबई। प्रतिनिधी,**
अजित पवारांना सत्तेत सहभागी करुन घेतल्याने शिंदे गट नाराज असल्याची चर्चा आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ाांनी यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अठकला दिलेल्या मुलाखतीत, एकनाथ शिंदे यांनी विश्वासात घेऊनच निर्णय घेण्यात आल्याचं ते म्हणाले आहेत. अजित पवारांना जेव्हा युतीत घेण्याचा निर्णय घेतला तेव्हा मी, देवेंद्र फडणवीस आणि इतर वरिष्ठांनी विश्वासात घेऊन निर्णय घेतला अशी माहिती दिली. सरकार बनवाताना आम्ही बाळासाहेबांची विचारधारा, हिंदुत्व यांना पुढे घेऊन जात आहोत. विकासाशी या सर्व गोष्टी जोडत आहोत. इतका विकास झाला आहे की, अजित पवारांनीही तो मान्य केला आहे. अजित पवार विकासालाच साथ देत आहेत. अजित पवारांचेही तेच विचार असून त्यासाठीच ते एकत्र आले आहेत. यापुढे अजून मजबूतीने काम होईल, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर जोरदार टीका केली. ते म्हणाले ''त्यांच्या पक्षाची जी स्थिती आहे ती पाहिली पाहिजे. आत्मचिंतन करायला हवं. दुसऱ्याचं घर पाहण्यापेक्षा आपलं घर शाबूत आहे का ते पाहायला हवं.

(उर्वरीत पान २ वर)

### भुजबळ काका-पुतणे पुन्हा केंद्रस्थानी



**■नाशिक। प्रतिनिधी,**
राष्ट्रवादीतील फुटीनंतर अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या काका-पुतण्यांमध्ये संघषार्चा नवा अध्याय सुरू झाला असताना दुसरीकडे याच पक्षाचे नेते छगन भुजबळ आणि त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांच्यात परस्पर सामंजस्याने राजकीय मशागतीचे प्रयोग होत आहेत. राष्ट्रवादी स्थापनेपासून राज्यस्तरीय अधिवेशनाचे भव्यदिव्य स्वरुपात आयोजन करण्यात माजी खासदार समीर भुजबळांचे योगदान असल्याचे प्रशस्तीपत्रक काकांनी राष्ट्रवादी फुटीनंतर एमईटीत झालेल्या मेळाव्यात दिले. अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्याच्या तयारीला त्यांना अतिशय कमी वेळ मिळाला. मैदानाच्या तुलनेत ही जागा अपुरी आहे.

(उर्वरीत पान २ वर)

### शिंदे गटातील आमदारांच्या नाराजीवर फॉर्म्युला ठरला?

#### शिंदे-फडणवीसांमध्ये खलबतं



**■मुंबई। प्रतिनिधी,**
अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचा एक गट सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांमध्ये नाराजी दिसून आली. शिंदे गटाच्या आमदारांना मिळणारी मंत्रिपदे कमी झाल्याने इच्छुकांच्या स्वप्नांवर पाणी फेरले असल्याची चर्चा सुरू झाली. आमदारांची नाराजी दूर करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात आज खलबतं झाली. नंदनवन बंगल्यावर दोघांमध्ये चर्चा झाली.


या बैठकीत नाराज आमदारांची नाराजी दूर करण्याचा दोन्ही नेत्यांकडून प्रयत्न सुरू करण्यात आले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीत मंत्रिमंडळ विस्तार आणि महामंडळ वाटपावर चर्चा झाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. येत्या आठवड्याभरात विस्तार करण्यावर दोन्ही नेत्यांचे एकमत झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

आता होणाऱ्या विस्तारात शिवसेना आणि भाजपच्या आमदारांना सर्वाधिक स्थान मिळणार असल्याचे निश्चित करण्यात आले असल्याचे वृत्त आहे.

(उर्वरीत पान २ वर)

### छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम घोषित

#### जास्तीत जास्त नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदविण्याचे आवाहन



**■ठाणे। प्रतिनिधी,**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्था/लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूका होणार असल्याने भारत निवडणूक आयोगाव्दारे दि. ०१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. सर्व घटकातील पात्र मतदारांची जास्तीत जास्त मतदार नोंदणी होण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे व उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यात ३ लोकसभा मतदारसंघ व १८ विधानसभा मतदार संघ असून दिनांक ०५ जानेवारी २०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार ठाणे जिल्ह्यात ६२,१४,५१७ इतके एकूण मतदार असून यामध्ये ३३,६७,१२० पुरुष मतदार आणि २८,४६,३१९ महिला मतदार आणि १०७८ तृतीयपंथीय मतदार आहेत.

(उर्वरीत पान २ वर)

**दिनांक ०१.०१.२०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम पुढील प्रमाणे -**

**पुनरिक्षण - पूर्व उपक्रम -**

- मतदार यादी संदभार्तील सर्व कायदे आणि मार्गदर्शक सुचना तसेच नविनतम क्ळ अस्त्रस्त्र्'३ङ्खल्ल आणि प्रणालीबाबत मतदार नोंदणी अधिकारी/सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी/मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना प्रशिक्षण - दि. ०१ जून २०२३ (गुरुवार) पासून ते दि. २० जुलै, २०२३ (गुरुवार).
- मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याव्दारा प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी - दि. २१ जुलै, २०२३ (शुक्रवार) ते दि. २१ ऑगस्ट, २०२३ (सोमवार).
- मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व प्रमाणीकरण. मतदार यादी/ मतदार ओळखपत्रातील त्रुटी दुर करणे इ., आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करुन मतदार यादीत सुधारणा करणे. तसेच, अस्पष्ट / अंधुक छायाचित्र बदलून त्याऐवजी संबंधित मतदाराकडून योग्य दजार्ची छायाचित्र प्राप्त करुन मतदार यादीत सुधारणा करणे. विभाग/भाग यांची आवश्यकतेनुसार नव्याने मांडणी करुन मतदान केंद्राच्या सीमांचे पुनर्रचना तयार करुन मतदान केंद्राच्या यादीस मान्यता घेणे आणि तुलनात्मक फरक शोधून फरक दूर करण्यासाठी कालबध्द योजना आखणे. कंट्रोल टेबल अद्यावत करणे. - दि. २२ ऑगस्ट, २०२३ (मंगळवार) ते दि. २९ सप्टेंबर २०२३ (शुक्रवार).
- नमुना १-८ तयार करणे. ०१ जानेवारी, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित पुरवणी व एकत्रीत प्रारुप यादी तयार करणे - दि. ३० सप्टेंबर, २०२३ (शनिवार) ते दि. १६ ऑक्टोबर, २०२३ (सोमवार).

**पुनरिक्षण उपक्रम :-**

- एकत्रीकृत प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे - दि. १७ ऑक्टोबर, २०२३ (मंगळवार).
- दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी - दि. १७ ऑक्टोबर, २०२३ (मंगळवार) ते दि. ३० नोव्हेंबर, २०२३ (गुरुवार).
- विशेष मोहिमांचा कालावधी - दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी निश्चित केलेले दोन शनिवार व रविवार.
- दावे व हरकती निकालात काढणे - दि. २६ डिसेंबर, २०२३ (मंगळवार) पर्यंत.
- अंतिम प्रसिध्दीसाठी आयोगाची परवानगी मागणे. डाटाबेस अद्यावत करणे आणि पुरवणी याद्यांची छपाई - दि. ०१ जानेवारी, २०२४ (सोमवार) पर्यंत.
- मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करणे - दि. ०५ जानेवारी, २०२४ (शुक्रवार).

### जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष...

#### चक्क गुरांच्या गोठ्यात भरते जिल्हा परिषदेची शाळा



**■मुंबई। प्रतिनिधी,**
एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्यात डिजिटल शाळेचा गवगवा.. तर, दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळेला स्वतःची जागा, इमारत नसल्याने गुरांच्या गोठ्याचा आधार घ्यावा लागत आहे. हे विदारक चित्र आहे जिल्ह्यातील लोहा तालुक्यात असलेल्या खिरूतांडा येथील जिल्हा परिषद शाळेचं. इमारत अभावी गुरांच्या गोठ्यात विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे घ्यावे लागत आहे.

लोहा तालुक्यात असलेल्या खिरूतांडा हे ऊसतोड कामगारांच गावं म्हणून ओळखलं जातं. गावातील नव्वद टक्के नागरिक ऊसतोडी साठी सहा सहा महिने बाहेर गावी जातं असतात. आपल्या मुलांना शिक्षणासाठी गावात नातेवाईकांकडे सोडत ठेवतात. मात्र या गावामध्ये कुठलीच सुविधा नाही. वर्ष २००० मध्ये या तांड्यात जिल्हा परिषद शाळेला मंजुरी मिळाली. हळूहळू विद्यार्थ्यांचा कल या शाळेकडे वाढत गेला. मात्र शाळेसाठी इमारत नाही.

(उर्वरीत पान २ वर)

# संपादकीय...



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## असुरक्षिततेच्या भयामुळे पक्षहानी!

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबत जे झाले तेच कधीतरी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याबाबत होणार होते, पण ती शक्यता लक्षात घेऊन शरद पवारांनी काळजी घेतली होती, पण विशिष्ट काळानंतर त्याचा उपयोग झाला नाही. शेवटी ते झालेच. शरद पवार यांच्यासोबत राजकारणात लहानाचे मोठे झालेले आणि त्यांचे राजकीय वारसदार म्हणून मानले जाणारे अजित पवार यांनी निर्णायक बंड करून काकांना धक्का दिला. अजितदादांनी यापूर्वीही बंडखोरी करून देवेंद्र फडणवीसांसोबत पहाटेला राजभवनावर उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. ते बंड शरद पवारांनी पद्धतशीरपणे मोडून काढले होते. त्याचसोबत अजितदादांना पुन्हा स्वगृही आणण्यात शरद पवार यांची पत्नी प्रतिभाताई पवार आणि कन्या सुप्रिया सुळे यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती, पण आताची परिस्थिती वेगळी आहे. यावेळी अजितदादा यांच्यासोबत पवारांचे खास समजले जाणारे छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील असल्यामुळे आता या बंडातून शरद पवारांना मागच्या वेळेसारखी हवा काढता येणे वाटते तितके सोपे नाही. त्यात पुन्हा काही दिवसांपूर्वी पवारांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन निवृत्तीचे संकेत दिले होते. त्यामुळे पवार आता निवृत्तीच्या दिशेला वळत आहेत याची कल्पना त्यांच्या जवळच्या सहकार्यांना आली होती. खरेतर पवारांची कन्या खासदार सुप्रिया सुळे यांना जेव्हा पवारांनी राजकारणात सक्रिय केले तेव्हाच अजित पवार नाराज झाले होते. कारण त्यांना सत्तेचे समांतर असे दुसरे केंद्र तयार झाले होते. त्यापासून सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांना पत्रकार प्रश्न विचारत असत की, शरद पवार यांचे राजकीय वारसदार कोण? त्याचे निश्चित उत्तर दोघांनाही देता येत नव्हते. शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली होती. त्यानंतर अजित पवार यांनी आपल्याला विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदामध्ये रस नाही. मला पक्षाची जबाबदारी द्या. आपल्याला प्रदेशाध्यक्षपदामध्ये रुची आहे, असे सांगितले होते. त्याच वेळी त्यांनी प्रदेशाध्यक्ष असलेले जयंत पाटील यांच्यावर टीका केली होती, पण अजितदादांच्या या नाराजीकडे शरद पवारांनी फारसे लक्ष दिले नाही. त्यानंतर अल्पावधीत अजितदादा त्यांच्या समर्थक आमदारांना घेऊन भाजपसोबत गेले. महाराष्ट्रात ठाकरे आणि पवार ही दोन प्रमुख राजकीय घराणी आहेत. अजितदादांनी बंड करून राष्ट्रवादी काँग्रेसवर दावा सांगितला आहे. जे एकनाथ शिंदे यांनी केले तेच अजितदादांनी केले. शिवसेना विचित्र पद्धतीने फुटली आहे. मराठी माणसाच्या हितासाठी स्थापन झालेल्या या संघटनेची जी दशा झाली आहे ती पाहून त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना हळहळ वाटू लागली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी आता एकत्र यावे, अशी मागणी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून होत आहे. तसे फलकही लावण्यात येत आहेत. नेते आपापल्या महत्त्वाकांक्षेसाठी वेगळे होतात, पण हातात हात घालून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवस्था कोणता झेंडा घेऊ हाती अशी होते.

# सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये राज्याचे प्रश्न मात्र दुर्लक्षित...

गेले काही महिने महाराष्ट्रात मुस्लीमविरोधी वातावरण निर्माण केले जात आहे, पण विरोधी पक्षांनी त्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही. आता नाशिकमधील जमावहल्ल्याच्या पार्श्वभूमीवर 'धर्मनिरपेक्ष' छगन भुजबळ आणि अजित पवार यांनी भाजपशी हातमिळवणी केली आहे. महाराष्ट्रात सुरू असलेली राजकीय पुनर्रचना किती निरर्थक आहे, हेच यातून स्पष्ट होते.

महाराष्ट्रात २०१९ पासून राजकीय पुनर्मांडणी सुरू आहे. त्यातली पहिली घटना म्हणजे शिवसेनेने भाजपबरोबरचे ३० वर्षांचे संबंध तोडून टाकले. त्यामुळे भाजप महाराष्ट्रात एकटा पडलाच शिवाय शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशी नवी आघाडी तयार झाली. गेल्या वर्षी शिवसेनेत पडलेल्या फुटीमुळे महाविकास आघाडीला खीळ बसली आणि भाजपची भूमिका दुय्यम असलेले नवे सरकार सत्तेवर आले. आता महाराष्ट्रातील महत्त्वाचा राज्यस्तरीय पक्ष असलेल्या राष्ट्रवादीमध्ये फूट पडली असून काही आमदारांचा गट सरकारमध्ये सामील झाला आहे. यातून महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती गुंतागुंतीची झाली असून त्यामुळे राज्यातील महत्त्वाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट भाजपच्या बाजूने का गेला हे सांगण्याची गरज नाही. त्यांनी सत्तेबाहेर असल्याबद्दल वारंवार नाराजी व्यक्त केली होती. १९९९ मध्ये स्थापना झाल्यापासून हा पक्ष सातत्याने सत्तेवर राहिला. सरकारी यंत्रणेचा वापर करण्यासाठी पक्ष हे त्यांच्या वरिष्ठ नेत्यांसाठीचे एक साधन ठरले. अजित पवार यांच्यासह बहुतेकांनी आपली सुरुवातीची वर्षे सत्ताकेंद्राजवळ घालवली आहेत. या मंडळींना विरोधक म्हणून कामच करता येत नाही, किंबहुना विरोधक म्हणून कसे काम करायचे असते, हे त्यांना माहीतच नाही. त्यामुळेच २०१४ पासून त्यांच्यापैकी बहुतेक जण पाण्याबाहेरच्या माशाप्रमाणे तडफडत आहेत.

या वेळी एक मोठा गट मोठया प्रमाणावर भाजपमध्ये सामील झाला आहे. भाजप राष्ट्रीय राजकारणात एक प्रमुख पक्ष म्हणून उदयास येत असल्याचे पाहून नेत्यांचा एक प्रवाहच त्या पक्षात सामील होताना आपण पाहिला आहे. त्यामुळे अजित पवार आणि इतर अनेकांनी भाजपशी हातमिळवणी का केली हा नाही, तर राज्याच्या राजकारणावर काय परिणाम होतील हा प्रश्न आहे. सध्या भाजप सगळ्यात खूश दिसतो आहे, तेव्हा या घडामोडींचा भाजपसाठी अर्थ काय आहे? पक्षाचे काही अतिउत्साही समर्थक अर्थातच असा युक्तिवाद करतील की त्यांनी २०१९ च्या अपमानाचा बदला घेतला आहे. तेव्हा पक्षाने मुख्यमंत्रीपद गमावले होते, त्यामुळे हा एक महत्त्वाचा मुद्दा असू शकतो. काही अतिचतुर लोकांचा असाही दावा असू शकतो की शिंदे गटाचे महत्त्व कमी होईल. परंतु शिंदे आणि अनुयायांचा मुळातच फारसा प्रभाव नसल्यामुळे त्याला तसा फारसा अर्थ उरत नाही.

शिंदे आणि पवार यांच्या नेतृत्वाखालील गटांना लोकसभेच्या जागांमध्ये फारसा रस नसल्यामुळे या दोन कुबडयांमुळे पुढच्या वर्षी लोकसभेच्या बऱ्यापैकी जागा जिंकता येतील, असे भाजपचे गणित असू शकते. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आणखी एका राज्यस्तरीय पक्षाची ताकद संपवून भाजपचे एक मोठे उद्दिष्ट साध्य झाले असावे. पुढील निवडणुकीसाठी मैदान मोकळे करण्यासाठी प्रत्येक राज्यात, तेथील प्रादेशिक पक्षांना उद्ध्वस्त करण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे. काँग्रेसला भाजपशी थेट लढत देण्यास बऱ्याच मर्यादा आहेत हे माहीत असल्याने, भाजप विविध राज्यांतील प्रादेशिक पक्षांना नेस्तनाबूत करू पाहात आहे. त्यानंतर आपल्याला हव्या त्या लहान लहान, कमी ताकदीच्या लोकांना उभे करता येते. त्यांची ताकदच कमी असल्याने त्यांना हवे तसे हाताळता येऊ शकते आणि हवे तेव्हा फेकूनही देता येते.

अशा प्रकारे, महाराष्ट्रातील घडामोडी भाजपसाठी फायद्याच्या ठरताना दिसत आहेत. अर्थात असे असले तरी ज्यांच्या हातातून एक पक्ष निसटला आहे, त्यांच्याबद्दलची लोकांच्या मनात असलेली सहानुभूती भाजपला त्रासदायक ठरू शकते. तसेच, महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत, 'शतप्रतिशत भाजप' (बहुमताने एकटयाच्या बळावर सत्तेवर येणे) ही महत्त्वाकांक्षा आता भाजपला बाजूला ठेवावी लागेल. भाजप या दोन्ही फुटीर गटांशी कसा वागतो, त्यांच्याबरोबरचे जागावाटप कसे होते, यावर भाजपला विधानसभेत किती जागा मिळणार हे अवलंबून असेल. भाजपचे असे काही नियोजन असण्याची दाट शक्यता आहे, आणि त्याला शिंदे आणि अजित पवार गटाकडे उत्तर आहे, असे दिसत नाही.

राष्ट्रवादीमधले हे सगळे नाटय.रविवारी सुरू झाल्यापासून, काँग्रेसचे काही सहानुभूतीदार असे सुचवत आहेत की, राज्यात काँग्रेस पक्षाचा विस्तार करण्याची ही उत्तम संधी आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी दगा दिल्याने काँग्रेस हा आता मुख्य विरोधक म्हणून उदयास आला पाहिजे, असे त्यांना वाटते. लोकसभेसाठी अजेंडा आणि जागावाटपाच्या बाबतीत आता काँग्रेसचा वरचष्मा असू शकतो, हे मूल्यमापन सैद्धांतिकदृष्टया योग्य आहे. तथापि, या अपेक्षा तीन कारणांसाठी निरर्थक आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे, प्रदेश काँग्रेसकडे लोकांपर्यंत पोहोचेल असे प्रभावी नेतृत्व नाही. काँग्रेसचा प्रभाव पडावा यासाठी राज्यातील पक्षात संपूर्ण फेरबदल करणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, काँग्रेसला उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासोबत काम करण्याबद्दलचे आपले आक्षेप बाजूला ठेवावे लागतील. राज्य काँग्रेसमधील वेगवेगळे गट असे करण्यास तयार नाहीत. (प्रदेश काँग्रेसने मुस्लिमांच्या रक्षणासाठी फार काही केले नसले तरी) काहींना शिवसेनेच्या हिंदूत्वासंदभार्तील भूमिकेबद्दल आक्षेप आहेत. आणि काहींचा ऐतिहासिक कारणांसाठी शरद पवारांना विरोध आहे.

२०१९ मध्येही, प्रदेश काँग्रेसचे नेतृत्व आणि स्वतः राहुल गांधीदेखील शिवसेनेसोबत जाण्यास फारसे तयार नव्हते असे म्हटले जात होते. तिसरी गोष्ट अशी की अनेक दिग्गज पक्षांतून बाहेर पडल्यामुळे आता शरद पवार त्यांच्या पक्षाची नव्याने बांधणी करण्यास उभे राहिले आहेत असे दिसते. त्यामुळेच राष्ट्रवादीत आपल्याला पुढे जायची पटापट संधी मिळेल या अपेक्षेने राजकारणात प्रवेश करू इच्छिणाऱ्यांसाठी राष्ट्रवादी हे यापुढच्या काळात आकर्षण असू शकते. स्थानिक नेतृत्वातच अडकलेली काँग्रेस नव्या अभ्यागतांसाठी असे आकर्षण ठरू शकत नाही.

या ताज्या घडामोडींमधून निर्माण झालेला खरा प्रश्न पडझड झालेल्या पक्षांच्या भवितव्याचा आहे. गेले वर्षभर फक्षफुटीबद्दलची सहानुभूती उद्धव ठाकरेंना मिळत होती. आता थेट शरद पवारांसारख्या बडया नेत्याला फटका बसल्याने उद्धव ठाकरेंबद्दलची सहानुभूती ओसरण्याची शक्यता आहे. हिंदूत्वाच्या प्रश्नावर सतत कराव्या लागणाऱ्या कसरतीमुळे आधीच अडचणीत असलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेची स्थिती त्यामुळे आता नाजूक बनू शकते. पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरे गट या दोघांनाही यापुढच्या काळात आपापली सामाजिक ओळख निर्माण करायची असल्याने ते दोघेही एकमेकांना पूरक बनण्याऐवजी त्यांच्यात स्पर्धा निर्माण होईल, अशीच शक्यता आहे.

शरद पवार यांच्यासाठी हा त्यांच्या राजकीय कारकीदीर्तील सर्वात कठीण काळ असू शकतो. राष्ट्रीय राजकारणाला प्राधान्य दिल्यानंतर आता त्यांना पुन्हा एकदा प्रादेशिक पातळीवर उतरावे लागत आहे. गंमत म्हणजे, त्यांचा राष्ट्रीय राजकारणावरचा भर आणि अजित पवारांचे राज्यपातळीवरील राजकारणावर एकमुखी लक्ष यातूनच त्यांच्यात सध्याचा बेबनाव झाला आहे. शरद पवार यांच्या राजकीय अस्तित्वासाठी राज्यस्तरीय राजकारण अत्यंत निर्णायक झाले आहे. या सगळयाचा त्यांच्या राष्ट्रीय राजकारणातील स्थानावर आणि भूमिकेवर परिणाम होऊ शकतो.

थोडक्यात, महाराष्ट्रात सुरू असलेल्या या राजकीय थरारपटाचा नेमका कुणाला फायदा होईल, हे आत्ताच सांगता येणार नाही. फायदा मिळवण्यासाठी आणि ही सगळी राजकीय स्पर्धा मतदारांना नीट समजावी यासाठी, आणखी काही रोमांचक घडामोडींची शक्यता शिल्लक राहतेच. राज्याच्या राजकारणाची वाटचाल कदाचित अशा नाटयमय घडामोडी घडवून आणू शकणाऱ्या पक्षावर आणि नेत्यावर अवलंबून असेल.

दरम्यान, या विनोदिकेचे शोकांतिकेत रूपांतर होईल, तशा राज्यातील धोरण आणि राज्यकारभार या गोष्टी मागे पडत जातील. मोदींच्या गोटात येणारे नवे लोक भाजपच्या राजवटीचे घसा कोरडा पडेपर्यंत गुणगान करतील; आणि सोयीस्करपणे, महाराष्ट्रात अल्पसंख्याकविरोधी भूमिकेला आपले स्थान पक्के करता येईल. म्हणजे या पक्षीय गदारोळात हिंदूत्वाचे राजकारण राज्यात स्थिरावले तर त्याचे (अप) श्रेय राष्ट्रवादीतून फुटून बाहेर पडलेल्या दिग्गजांकडे जाईल!

## संकटाची चाहूल...

काही महिन्यांपासून राजकीय गर्जना सर्वांच्याच अंगवळणी पडू लागल्या असल्या, तरी मान्सूनच्या खऱ्याखुऱ्या गर्जना आणि पाठोपाठ येणाऱ्या धुंवाधार सरींनी उसंत घेतल्याने राज्यात सर्वदूर चिंता वाढली आहे. 'एल निनो'सह इतर वातावरणीय घटकांमुळे ऋतुचक्र प्रभावित होऊन दोन-तीन वर्षांपासून मान्सून लांबणीवर पडत असल्याचे एव्हाना लक्षात आल्याने जून कोरडा जाण्याची भीती अखेर खरी ठरली. परंतु, जुलैच्या पहिल्या आठवड्यातच पाऊस अनुशेष भरून काढेल, ही शक्यता अशक्यतेत परावर्तित होते की काय, अशी परिस्थिती पावसाने उघडीप दिल्याने निर्माण झाली. मुंबईसह कोकण किनारपट्टी आणि घाटमाथा परिसरात दोन-तीन दिवस दमदार पाऊस कोसळला असला, तरी उर्वरित महाराष्ट्रात त्याने ओढ दिल्याने शेतकऱ्यांसह जनसामान्यांच्या मनातही 'पाऊसतुटी'च्या शंकेची पाल चुकचुकते आहे. यंदा पर्जन्यमान सरासरी गाठणार नाही, हा हवामान खात्याचा इशारा तंतोतत खरा ठरण्याची साग्रसंगीत प्रचीती येऊ लागली आहे. राज्यभरात जूनमध्ये सरासरीच्या चाळीस टक्के पाऊस झाला असला, तरी बऱ्याचशा भागात त्याने तोंडदेखली हजेरीही न लावल्याने पिण्याच्या पाण्यासह पहिल्या आणि काही ठिकाणी दुबार पेरणीचेही संकट गहिरे झाले. पाचही विभागांतील पेरणीची आकडेवारी अवघी दोन ते पाच टक्के आहे. पहिल्या पावसाच्या भरवशावर कोंब फुटलेल्या सोयाबीन, भुईमूग, मूग, उडीद अशा सर्वच पिकांना तगून राहण्यासाठी पावसाची नितांत गरज आहे. शंभर मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरण्या करू नका, असे आवाहन सरकारी यंत्रणा वारंवार करीत असल्या, तरी किनारपट्टी वगळता बऱ्याच भागांत सरासरी ४० मिमी इतकाच पाऊस झाला आहे. पर्जन्यअभावी धरणांनी तळ गाठला आहे. भाजीपाला आणि फळभाज्यांचे भाव कडाडले आहेत.

# पान १ वरुन

## अजित पवार गटाविरोधात थेट निलंबनाची कारवाई

देशातल्या विविध राज्यातल्या राष्ट्रवादीच्या पदाधिकार्यांना या बैठकीसाठी आमंत्रण देण्यात आल आहे.

**बैठकीला अजित पवार यांची हरकत**

अजित पवार यांनी दिल्लीतल्या शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीस हरकत घेतली आहे. या संदर्भात निवडणूक आयोग कडे याचिका आधीच दिली आहे. त्यामुळे आता दिल्लीत बैठक घेण्यावर अजित पवार यांची हरकत नोंदवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस कोणाची याचा फैसला आता निवडणूक आयोगात होण्याची शक्यता आहे. कारण, अजित पवार विरुद्ध शरद पवार लढाई आता निवडणूक आयोगात पोहोचली आहे. दोन्ही गटांनी निवडणूक आयोगात अर्ज दाखल केलेत. शरद पवारांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून अजित पवारांसह ९ मंत्र्यांचं निलंबन केल्याची माहिती दिलीय. त्यानंतर आता अजित पवार गटाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसंच चिन्हावरही दावा केलाय. तर पक्षावर कोणी दावा केल्यास आमचीही बाजू ऐकली जावी असा अर्ज शरद पवार गटाने केला आहे.

## अजित पवारांना पक्षावर दावा करता येणार नाही, कारण, घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांचं मोठं विधान

आज शरद पवारांच्या पक्षाची घटना निवडणूक आयोगाकडे आहे. खरा पक्ष अजून शरद पवारांकडेच आहे. जे निवडून आलेले लोक असतात ते पक्षाच्या बळावर निवडून येतात. त्यामुळे विधीमंडळ पक्ष खरा पक्ष होऊ शकत नाही, असं मत उल्हास बापट यांनी व्यक्त केलं. उल्हास बापट पुढे म्हणाले, लोक त्या आमदाराला मत करत नसतात त्या पक्षाला मत करतात. मतदार त्या पक्षाच्या विचारधारेला मत करत असतात. त्यामुळे आमदार पक्ष सोडून दुसरीकडे गेला, तर स्वतःची आई सोडून तिकडे गेल्यासारखं आहे. तुम्ही नाळ तोडू शकत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. त्यामुळे बाहेर गेले तो विचार करण्याचा एक मुद्दा आहे. परंतु तिथं बहुमत आहे म्हणून तो पक्ष त्यांचा असा दावा अजित पवारांना करता येऊ शकत नाही. आत्ता अजित पवारांना पक्षावर किंवा पक्षचिन्हावर दावा करता येणार नाही. त्यांना आत्ता निवडणूक आयोगाकडे जावं लागेल. तिथं आयोग कुठला पक्ष खरा यावर निर्णय घेईन. त्यानंतर मग पक्ष आणि पक्षचिन्ह कुणाकडे हे ठरेल,'' असंही उल्हास बापट यांनी नमूद केलं.

## शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची सारखीच अवस्था!

अजित पवार यांनी तर पवारांवर बोचरी टीका केली. निवृत्त व्हा, इथपर्यंत सल्ला दिला. अजित पवार यांनी केलेल्या टीकेमुळे शरद पवार यांना सहानुभूती मिळेल, अशी शक्यता त्यांच्या गोटातून व्यक्त केली जात आहे. गेल्या वर्षी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ज्या दिव्यातून गेले तोच प्रकार सध्या शरद पवार हे अनुभवत आहेत. पक्षाचे नाव आणि चिन्हावर अजित पवार यांनी दावा केला आहे. तसेच राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी अजित पवार यांची नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र निवडणूक आयोगाला देण्यात आले आहे. गेल्या वर्षी शिवसेनेत असाच प्रकार घडला होता. विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी कोणाच्या बाजूने अधिक आहेत त्याचा पक्षावर दावा या सूत्रानुसार एकनाथ शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह दिले होते. राष्ट्रवादीच्या बाबतीच असाच वाद निर्माण झाल्यास अधिक खासदार-आमदार कोणत्या बाजूला अधिक त्याच्याकडे पक्षाची सूत्रे जाण्याची चिन्हे आहेत. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यात सध्या समान धागा असला तरी पवार हे लढण्याच्या भूमिकेत आहेत. अजित पवार यांच्या बंडानंतर दुसऱ्याच दिवशी पवारांनी कराडला जाऊन शक्तिप्रदर्शन केले. तसेच बंड करणाऱ्या नेत्यांच्या मतदारसंघात जाऊन सभा घेण्याचे जाहीर केले आहे. महाराष्ट्र पिंजून काढण्याची भावना त्यांनी बोलून दाखविली. राष्ट्रवादीतील संघर्ष कोणत्या वळणावर जातो हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अजित पवारांना सत्तेत सहभागी करताना विश्वासात घेतलं का?

माझी काल आमदार, खासदारांसोबत बैठक झाली. आमच्या सरकारचा शपथविधी झाल्यापासून हे सरकार जाणार असं बोललं जात आहे. पण हे सरकार मजूबत होत चाललं आहे. तिन्ही पक्षांचे मिळून सदस्य २०० च्या पुढे गेले आहेत. आम्हाला केंद्र सरकार, पंतप्रधानांचा पाठिंबा आहे. गृहमंत्रीही यात लक्ष्य घालतात. आमच्या प्रस्तावाला तात्काळ मान्यता दिली जाते. डबल इंजिन सरकार वेगाने काम करत असल्याने यांच्या पोटात दुखत आहे, अशी टीका त्यांनी केली. आम्ही सत्ता सोडली होती. पुढे काय होणार हे आम्हाला माहिती नव्हतं. पण एक विचारधारा, भूमिका घेत आम्ही सत्तेतून बाहेर पडलो होतो. आम्हाला खुर्चीची लालसा नाही. आमच्या आमदारांनी पुढे काय होईल याचीही पर्वा केली नव्हती. अजित पवार आणि सहकारी आल्याने सरकार मजबूत झालं आहे. अजून वेगाने विकास होईल. हे सर्वसामान्यांच्या भल्यासाठी सरकार आहे. मी पण सर्वसामान्य आहे. शेतकऱ्याचा मुलगा आहे, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. राज्यात इतक्या वेगाने काम होत आहे. देशातील पहिल्या क्रमांकाच्या पायाभूत सुविधा येथे मिळत आहेत. मी आणि देवेंद्र यांनी सरकार बनवलं तेव्हा पहिल्या क्रमांकावर आलो. आता विकासाच्या मुद्दयावर आणि मोदींच्या नेतृत्वाच्या माध्यमातून अजित पवार आमच्यासह आले असून त्यांचं स्वागत आहे , असंही ते म्हणाले. ठाकरे गटाने काही नाराज नेते आमच्या संपर्कात असल्याचं म्हटलं आहे. त्यासंबंधी बोलताना एकनाथ शिंदेंनी सांगितलं की, ''आमच्याकडे २०० पेक्षा जास्त आमदार आहेत. येथे इतके मजबूत सरकार आहे. जे संपर्कात आहेत त्यांची नावं सांगावीत. आम्ही गुवाहाटीत असल्यापासून असे दावे करत आहे. आमदारांची मतदारक्षेत्रात काम करण्याची आणि त्यांनी न्याय देण्याची भूमिका आहे. २०२४ लोकसभा निवडणूक नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात होईल. महाराष्ट्रात ४५ पेक्षा अधिक जागा येतील. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत आम्ही ऐतिहासिक कामगिरी करु. यामुळेच ते घाबरले आहेत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काही समस्या येणार नाही. आमदारांच्या जागा कायम असतील. उर्वरित जागा वाटून घेऊ,'' असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

## भुजबळ काका-पुतणे पुन्हा केंद्रस्थानी

त्यामुळे गर्दीत उपस्थितांना काही अडचण होऊ शकते, अशा दिलगिरीवजा सूरात भुजबळांनी अल्पावधीत केलेल्या जय्यत तयारीचे श्रेय पुतण्याच्या पदरात टाकले. मुंबईतील एमईटी संस्थेत झालेला अजितदादा गटाचा मेळावा छगन भुजबळ यांच्या राजकीय भूमिकेत ३६० अंशाच्या कोनात झालेले बदल दर्शविणारा ठरला. भुजबळ यांचे हे दुसरे राजकीय बंड. १९९१ मध्ये शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर शिवसैनिकांच्या धाकाने ते लगेच फारसे बोलू शकले नव्हते. पण, राष्ट्रवादीत बंडाचा झेंडा रोवताना त्यांनी ही कसर भरून काढली. वाकचातुर्याच्या बळावर बदललेली भूमिका सहजतेने, बंडखोरीच्या इतिहासाचे दाखले देत त्यांनी शरद पवार यांना थेट आव्हान दिले. राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी अकस्मात मंत्रिपदाची शपथ घेतली नाही. पक्षावर ताबा मिळविण्यासाठी कायदेशीर बाजू तपासून सर्वकाही करण्यात आले. कायदेशीर अभ्यास आणि विचारांती हे नियोजन झाल्याचा उलगडा खुद्द भुजबळ यांनी केला. शिवसेनेतून काँग्रेसमध्ये दाखल झाल्यापासून भुजबळ यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवला होता. पवारांनी ओबीसींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या नेत्याला कुठलीही तोशिष भासू दिली नव्हती. पक्षातील मराठा नेत्यांच्या दादागिरीला शह देण्यात भुजबळांना नेतृत्वाशी निकटचे संबंध कामी आले होते. त्यामुळे १९९९ मध्ये काँग्रेस आघाडी सरकारमध्ये दादांना डावलून भुजबळांना उपमुख्यमंत्रिपदाची पहिली संधी मिळाल्याचा इतिहास आहे. महाराष्ट्र सदन घोटाळा आणि मनी लॉडरिंग प्रकरणात जामीन मिळाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारमध्ये पक्षीय विरोध बाजूला ठेवत पवारांनी त्यांना मंत्रिपद बहाल केले होते. राष्ट्रवादीत अजितदादा आणि भुजबळ यांच्यात फारसे सख्य नसल्याची चर्चा वारंवार होत असे. पवारांच्या मदतीने त्यांना दादांवर मात करणे शक्य होते, असे बोलले जायचे. आता त्याच दादांसमवेत भुजबळांनी मंत्रिपदाची शपथ घेऊन शरद पवार यांनाच धक्का दिला. एमईटीतील मेळाव्यात भुजबळांनी अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नव्या दमाने वाटचाल करणार असल्याचे म्हटले आहे. म्हणजे काकांचे नेतृत्व सोडून भुजबळांनी पुतण्याचे नेतृत्व मान्य केले आहे.

**पुतण्याच्या पुनर्वसनासाठी पायाभरणी**

राष्ट्रवादीवर ताबा मिळविण्यावरून पवार काका-पुतण्यात राजकीय, कायदेशीर वादाला तोंड फुटले असताना दुसरीकडे भुजबळ काका-पुतणे अतिशय समन्वयाने काम करीत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले. महाराष्ट्राच्या राजकारणात काका-पुतण्यांमध्ये मतभेद, वाद झालेली अनेक कुटूंब आहेत. परंतु, भुजबळ काका-पुतण्यात कधीही तसा प्रकार झाल्याचे घडलेले नाही. आजवर पक्षाचे राजस्तरीय अधिवेशन असो, मेळावे असो, ते भव्यदिव्य स्वरुपात आयोजनात भुजबळांना पुतणे समीर यांचे सक्रिय सहाय्य लाभले आहे. एमईटीतील अजितदादा समर्थक राष्ट्रवादीच्या मेळाव्यात त्याची पुनरावृत्ती झाली. मेळाव्याच्या तयारीला केवळ दोन दिवस मिळाले. पावसाळ्यात मैदानावर मेळावा घेणे अवघड होते. अल्पावधीत समीर भुजबळांनी ही तयारी केल्याचा दाखला काकांनी दिला. पक्षाच्या स्थापनेपासून मेळावे, अधिवेशनाची नियोजनबध्द तयारी पुतण्या समीर, मुलगा पंकज आणि त्यांचे सहकारी करीत असल्याकडे भुजबळांनी लक्ष वेधले. नाशिकमध्ये २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिवेशन पार पडले होते. त्या आयोजनाबद्दल शरद पवार यांनी समीर यांचे कौतुक केले होते. लगोलग त्यांना नाशिक लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीची उमेदवारी मिळून ते निवडून आले होते. त्यानंतर पुढील काळात हा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या हातातून निसटला. बदलत्या समीकरणात काकांनी पुतण्या समीर यांचे राजकीय पुनर्वसन करण्याचे प्रयत्न सुरू केल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात होत आहे.

## शिंदे गटातील आमदारांच्या नाराजीवर फॉर्म्युला ठरला?

**महामंडळाचे वाटप होणार**

मंत्रिमंडळ विस्तारासोबत महामंडळाचे देखील लवकरात लवकर वाटप करत नाराजी दूर करण्याचा प्रयत्न शिंदे आणि फडणवीस यांच्याकडून करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस जरी सत्तेत सोबत असली तरी भाजप आणि शिवसेनेच्या आमदारांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे. हीच बाब दोन्ही गटाच्या आमदारांना मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री पटवून देणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**शिंदे गटाच्या आमदारांमध्ये नाराजी?**

लवकरच मंत्रिमंडळात आपल्याला स्थान मिळणार असल्याची अपेक्षा लावून बसलेल्या शिंदे गटाच्या आमदारांना अजित पवारांच्या एन्ट्रीने धक्का बसला आहे. त्यामुळे शिंदे गटातील अनेक आमदारांमध्ये नाराजी आहे. तर गरज नसतांना राष्ट्रवादीला सोबत का घेण्यात आले असा प्रश्न पडला असल्याचे संजय शिरसाट म्हणाले आहे. तसेच माझ्यासह अनेकजण मंत्रीपदासाठी इच्छुक असल्याचे देखील शिरसाट म्हणाले आहे. त्यामुळे आम्हाला संधी कधी मिळणार? आम्ही देखील बंड केला होता, आम्ही फक्त पालख्या वाहत राहायचे का? असा प्रश्न नाराज आमदारांकडून बैठकीत उपस्थित करण्यात आल्याचे देखील माहिती सूत्रांनी दिली आहे.

**भाजपमध्येही नाराजी?**

मंत्रीपदासाठी इच्छुक असलेल्या शिंदे गटातील अनेक आमदारांनी यापूर्वीच उघडपणे बोलून दाखवले आहेत. तर भाजपमध्ये देखील काही इच्छुक आहेत. मात्र आजपर्यंत भाजपच्या आमदारांकडून उघडपणे यावर भाष्य करण्यात आले नाही. तर अजित पवारांच्या एन्ट्रीमुळे भाजपमधील इच्छुकांची देखील धाकधूक वाढली असावी. पण आतापर्यंत भाजपमधील नाराजीची कधीच उघडपणे चर्चा झाली नाही. मात्र भाजपमध्ये देखील नाराजी असल्याचे वक्तव्य शिरसाट यांनी केल्याने, भाजप आमदारांच्या नाराजीची चर्चा होऊ लागली आहे.

## छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम घोषित

ठाणे जिल्ह्यात एकूण ६३९१ मतदान केंद्रे असून ५४०२ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कार्यरत आहेत. दिनांक २१ जुलै २०२३ ते २१ ऑगस्ट २०२३ या एक महिन्याच्या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी त्यांच्या यादीभागातील मतदारांच्या तपशीलाची घरोघरी भेटी देऊन संबंधित कुटुंब प्रमुखांकडून पडताळणी करणार आहेत. तसेच या व्यतिरिक्त अ) नोंदणी न केलेले पात्र मतदार (०१ जानेवारी, २०२३ रोजी पात्र), आ) संभाव्य मतदार (०१ जानेवारी, २०२४ रोजी पात्र), इ) संभाव्य मतदार (पुढील तीन अर्हता दिनांकावर पात्र), ई) एकापेक्षा अधिक नोंदी/मयत मतदार/कायमस्वरुपी मयत मतदार, उ) मतदार यादीतील नोंदीत दुरुस्ती तपासणी करणार आहे. समाजातील कोणत्याही घटकातील पात्र व्यक्ती मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये यासाठी विविध घटकातील पात्र व्यक्तींना मतदार यादीमध्ये सामावून घेण्यासाठी तृतीयपंथी/देह विक्री व्यवसाय करणाऱ्या महिला/दिव्यांग/कातकरी/बेघर/भटक्या व विमुक्त जमाती इत्यादी वंचित घटकांतील पात्र व्यक्तीची मतदार नोंदणी वाढविण्यासाठी विविध शिबीरांचे आयोजन करुन त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करता येणार आहे. शाळा / महाविद्यालयातील संभाव्य मतदारांची मतदार नोंदणी होणार असल्याने १७ वर्षावरील युवक/युवतींची जास्तीत जास्त मतदार नोंदणी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नेहरू युवा केंद्र संघटना, भारत स्काऊट यांच्या सहकार्याने मतदार नोंदणीसाठी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे. तसेच मतदार / भावी मतदार त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट / मतदार यादीतील चुकांची दुरुस्ती / स्थलांतरण/ मयत मतदाराची वगळणी / मतदार यादीत नाव आहे किंवा नाही यासाठी मा. भारत निवडणूक आयोगाव्दारे करण्यात आलेल्या voters.eci.gov.in या संकेतस्थळाचा वापर करता येणार आहे, असे जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष...

इमारत अभावी शिक्षकांना चक्क दहा बाय पाच एवढ्या जागेत असलेल्या जनावरांच्या गोठ्यात शाळा भरावी लागत आहे. विद्यार्थ्यांना या गोठ्यात बसवून शिक्षण घ्यावे लागत आहे. पहिली ते चौथी पर्यंत शाळा असून सध्या शाळेत २२ विद्यार्थी आहेत आणि दोन शिक्षक आहेत. मागील अनेक वर्षा पासून खिरूतांडा येथे ही विदारक परिस्थिती आहे. पावसाळ्यात तर यापेक्षा ही परिस्थिती गंभीर असते. शाळा भरविण्यासाठी दुसरी जागा नाही, त्यामुळे पाऊस पडला तेव्हा विद्यार्थ्यांना सुट्टी द्यावी लागते.

**जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष**

शासनाच्या कल्याणकारी योजना घराघरात पोहोचवण्यासाठी जिल्ह्यात शासन आपल्या दारी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नुकतेच नांदेडमध्ये येऊन गेले. खिरूतांडा या गावात शाळेच्या इमारतीसोबतच पिण्याचं पाणी, स्वच्छतागृह व स्मशानभूमीचा गंभीर प्रश्न आहे. या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन अद्यापही खिरूतांडा या गावाच्या दारी पोहोचलं नाही. दरम्यान, ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडं सातत्यानं पाठपुरावा केला परंतु त्यांनी केवळ आश्वासने दिली. तर लोकप्रतिनिधी निवडणुकीनंतर गावात फिरकलेही नाही असा आरोप ग्रामस्थ कृष्णा राठोड यांनी केला आहे

**इमारतीसाठी पैसे आले... पण गेले कुठे**

खिरूतांडा येथील जिल्हा परिषदेच्या शाळा बांधकामासाठी २०१५ मध्ये आठ लाख रुपये निधी आला होता. गावातील ९ एकर गायरान जमिनीवर बांधकाम करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, लांडगे वाडी ग्रामपंचायतीने निर्णय दिला नाही. यावर जिल्हा प्रशासन निर्णय घेऊन शकतं. निर्णय न झाल्याने शाळा बांधकामाचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे. असं ग्रामस्थांचा आरोप आहे.

**अहवालानंतर निर्णय घेणार – शिक्षणाधिकारी**

दरम्यान गुरांच्या गोठ्यात शाळा भरत असल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने आपली बाजू मांडली आहे. निधी उपलब्ध आहे, मात्र जागे अभावी शाळेच्या इमारतीच्या प्रश्न रखडला आहे. या प्रकरणी अहवाल मागवून निर्णय घेणार असल्याचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सविता बिरगे यांनी सांगितले



# वॉटर फास्टिंगने वजन झटपट कमी करता येते?

अनेकदा उपवासाला फक्त पाण्याचे सेवन केले जाते. तसेच, काही जण वजन कमी करण्यासाठी फक्त पाणीच पितात. पण खरंच फक्त पाणी पिऊन वजन कमी करता येतं का? 'शिकागो इलिनॉय युनिव्हर्सिटी'च्या संशोधनानुसार, वॉटर फास्टिंगमुळे वजन झपाट्याने कमी होते. पण ते फार काळ प्रभावी ठरत नाही. काही दिवस पाणी उपवास करणे फायदेशीर असल्याचा दावाही या विद्यापीठाच्या संशोधकाने केला आहे. पण जर तुम्ही लठ्ठपणा कमी करण्यासाठी असे करत असाल तर ते दीर्घकाळासाठी चांगले नाही. या उपवासाची एक चांगली गोष्ट म्हणजे यामुळे पोट आणि पचनाशी संबंधित लहान-मोठे आजार दूर होतात. तसेच, काही प्रमाणात, वॉटर फास्टिंग रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी प्रभावी ठरतो.

### कॅलरीज कमी होतात

- जे लोक दररोज अशा प्रकारचे उपवास करतात त्यांच्यावर वॉटर फास्टिंगचा विशेष परिणाम होत नाही. तसेच, वैद्यकीय पर्यवेक्षणाशिवाय कोणीही पाच दिवसांपेक्षा जास्त उपवास करू नये यावर भर देण्यात आला आहे. वैद्यकीयदृष्ट्या पर्यवेक्षित उपवास युरोपमध्ये लोकप्रिय आहे. येथे लोक दिवसा फक्त थोड्या प्रमाणात ज्यूस किंवा सूप पितात.
- संशोधकांना असे आढळून आले की, उपवासामुळे काही काळ वजन कमी होण्यास मदत होते. पाच दिवस उपवास करणाऱ्यांचे वजन ४ ते ६ टक्के कमी झाले. ज्यांनी सात ते दहा दिवस उपवास केला. त्यांचे वजन सुमारे २ ते १० टक्के कमी झाले आणि ज्यांनी १५ ते २० दिवस उपवास केला. त्याचे वजन ७ ते १० टक्के कमी झाले.
- ज्या लोकांनी पाच दिवसांच्या पाण्याच्या उपवासात वजन कमी केले त्यांचे वजन तीन महिन्यांत सारखे राहिले. काही अभ्यास आणि संशोधनांमध्ये टाईप १ आणि टाईप २ मधुमेह असलेल्या सहभागींचा समावेश होता. ज्यांनी उपवास केला त्यांच्यावर कोणताही दुष्परिणाम झाला नाही, जरी त्यांचे बारकाईने निरीक्षण केले गेले आणि उपवास दरम्यान त्यांना इन्सुलिनचा डोस दिला गेला. या दीर्घ उपवासांचे देखील दुष्परिणाम आहेत, जसे की डोकेदुखी, निद्रानाश आणि भूक. मेटाबॉलिक ॲसिडोसिस किंवा मृत्यू यांसारख्या गोष्टी अभ्यासात घडल्या नाहीत. या दीर्घ उपवासांमध्ये सहभागी झालेल्या लोकांचे वजन कमी झाले. स्नायूंच्या तुलनेत चरबी कमी झाली.

### संपूर्ण संशोधन निष्कर्ष

- वॉटर फास्टिंगने वजन लवकर कमी होते पण जास्त काळ काम होत नाही, असा निष्कर्ष या संशोधनातून समोर आला आहे. अशा परिस्थितीत, संशोधकाचे असे मत आहे की, वॉटर फास्टिंग करण्याऐवजी, मधूनमधून उपवास करणे अधिक प्रभावी आहे आणि त्याचे परिणाम दीर्घकाळापर्यंत दिसून येतात.

# लहान मुलांनाही येतोय हृदयविकाराचा झटका... नेमकं कारण काय?



सध्याच्या धावपळीच्या काळात आरोग्याकडे लक्ष देणं फार गरजेचं झालं आहे. आरोग्याकडे थोडा जरी निष्काळजीपणा केला तर तो महागात पडू शकतो. आपण अनेकदा वृद्धांमध्ये, तरूणांमध्ये हृदयविकाराचा झटका आल्याचं ऐकलं आहे. पण, लहान मुलांमध्येही हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका आता दिसू लागला आहे. याचाच प्रत्यय काही दिवसांपूर्वी आला. गुजरातमध्ये नुकतीच एक वेदनादायक घटना समोर आली आहे. शाळेत जेवणाच्या सुट्टी दरम्यान एका विद्यार्थ्याला पायऱ्यांवर हृदयविकाराचा झटका आला आणि त्याचा मृत्यू झाला. तसेच, यावर्षी एप्रिलमध्ये तेलंगणातील एका गावात १३ वर्षांच्या मुलीचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. देशातील लहान मुलांमध्ये हृदयविकाराच्या वाढत्या संख्येने सर्वांनाच चिंतेत टाकलं आहे. आतापर्यंत पालक मुलांच्या हृदयविकाराच्या झटक्याबद्दल निश्चिंत असायचे, पण आता अशा घटनांनी पालकही चिंतेत असल्याचं पाहायला मिळतंय. याच संदर्भात तज्ज्ञांकडून मुलांमध्ये हृदयविकाराचा धोका का वाढतोय या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

### जन्मापासूनच मुलांमध्ये हृदयविकाराचा धोका असतो का?

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, काही मुलांना जन्मापासूनच हृदयविकाराचा धोका असतो. जेव्हा आई गरोदर राहते, तेव्हा मुलांना जन्मजात हृदयविकाराची झळ बसते आणि त्यांना याच भीतीने आयुष्य काढावं लागतं. या आजारात हृदय आणि रक्तवाहिन्यांवर जास्त प्रभाव पडतो. हा हृदयविकाराचा सर्वात मोठा धोका असतो.

### निष्काळजीपणामुळे मुले हृदयविकाराला बळी पडत आहेत का?

या संदर्भात आरोग्य तज्ज्ञांचं म्हणणं असं आहे की, सुदृढ बालकेही जन्माच्या वेळी हृदयविकाराच्या झटक्याला बळी पडत आहेत. पालकांचा निष्काळजीपणाही यामागे एक कारण असू शकतं. मुलांसमोर धुम्रपान, खाण्या-पिण्यात निष्काळजीपणा, अस्वास्थ्यकर जीवनशैली, मुलांना खेळण्यासाठी न पाठवणे, अभ्यासाचा दबाव अशा अनेक कारणांमुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. त्यामुळे लहान वयातच रक्तदाब, शुगर, कोलेस्टेरॉल यांसारखे आजार मुलांमध्ये दिसून येत असून त्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

### मुलांमध्ये हृदयविकाराची लक्षणे कोणती?

- त्वचा किंवा ओठ निळसर रंगाचे होतात
- खाण्यास त्रास होणे
- धाप लागणे
- थोडं जरी चालले तरी धाप लागणे
- योग्यरित्या मुलांची वाढ न होणे
- चक्कर येणे, सांधेदुखी आणि छातीत दुखणे

### मुलांमध्ये हृदयविकाराची लक्षणे दिसल्यास काय करावे?

हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे मुलांमध्ये दिसल्यास पालकांनी त्याकडे दुर्लक्ष करू नये. ताबडतोब मुलांना डॉक्टरांकडे नेऊन तपासण्या कराव्यात. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच त्यांचे आहार आणि जीवनशैली सुरु ठेवावी.

## कथा/बोधकथा


# एकीचे बळ

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याला चार मुलगे होते. शेतकरी खूप मेहनती होता. हेच कारण होते की त्यांचे सर्व मुलगे देखील त्यांचे प्रत्येक काम पूर्ण मेहनत आणि प्रामाणिकपणे करत असत, परंतु समस्या अशी होती की शेतर्कयांची सर्व मुलांचं एकमेकांशी अजिबात जुळत नव्हतं. छोट्या छोट्या गोष्टीवरून ते एकमेकांशी भांडायचे. आपल्या मुलाच्या या भांडणामुळे शेतकरी खूप काळजीत असायचा. यासाठी शेतकऱ्याने आपल्या मुलांना अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या बोलण्याचा चारही भावांवर काहीही परिणाम झाला नाही. हळूहळू शेतकरी म्हातारा झाला, पण त्याच्या मुलांमधील आपसी भांडण थांबण्याचे नाव घेत नव्हते. अशा स्थितीत एके दिवशी शेतकऱ्याने एक कल्पना काढली आणि मुलांची भांडणाची ही सवय दूर करण्याचा निर्णय घेतला. त्याने आपल्या सर्व मुलांना बोलावून आपल्याजवळ बोलावले. शेतकऱ्याचा आवाज ऐकून सर्व मुले वडिलांकडे पोहोचली. वडिलांनी या सर्वांना एकत्र का बोलावले हे ते समजू शकले नाही. सर्वांनी वडिलांना बोलावण्याचे कारण विचारले. शेतकरी म्हणाला - आज मी तुम्हा सर्वांना एक काम देणार आहे. मला हे पाहायचे आहे की तुमच्यापैकी कोण हे काम चांगले करू शकेल. सर्व पुत्र एकाच स्वरात म्हणाले - बाबा, तुम्हाला जे काम द्यायचे आहे ते द्या. आम्ही ते पूर्ण मेहनत आणि प्रामाणिकपणे करू. मुलांचे हे बोलणे ऐकून शेतकरी मोठ्या मुलाला म्हणाला, 'जा आणि बाहेरून काठ्या घेऊन ये'. शेतकऱ्याने त्याच्या दुसऱ्या मुलाला दोरी आणायला सांगितली. वडील बोलताच मोठा मुलगा लाकूड आणण्यासाठी गेला आणि दुसरा मुलगा दोरी आणण्यासाठी बाहेर धावला. काही वेळाने दोन्ही मुले परत आले आणि त्यांनी लाकडे व दोरी वडिलांना दिली. आता शेतकऱ्याने आपल्या मुलांना ही सर्व लाकडे दोरीने बांधून बंडल बनवण्यास सांगितले. वडिलांच्या आदेशानुसार मोठ्या मुलाने सर्व लाकडे एकत्र बांधून बंडल बनवले. लाकडांची एकत्रित मोळी तयार झाल्यावर मोठ्या मुलाने शेतकऱ्याला विचारले - बाबा, आता आम्हाला काय करायचे आहे? वडील हसले आणि म्हणाले- 'मुलांनो, आता तुम्हाला तुमच्या ताकदीने या लाकडाचे दोन भाग करावे लागतील.' वडीलांचे म्हणणे ऐकून मोठा मुलगा म्हणाला, 'हे माझ्या डाव्या हाताचे काम आहे, मी हे काम मिनिटात करेन.' दुसरा मुलगा म्हणाला, 'त्यात काय, हे काम सहज होईल.' तिसरा मुलगा म्हणाला, 'माझ्याशिवाय हे काम कोणीही करू शकणार नाही.' तर चौथा म्हणाला , 'नाही, मी सगळ्यात बलवान आहे. माझ्याशिवाय हे काम दुसरे कोणी करू शकत नाही.' मग काय, सगळे आपापले म्हणणे सिद्ध करण्यात मग्न झाले आणि पुन्हा एकदा चार भावांमध्ये भांडण सुरू झाले. शेतकरी म्हणाला - 'मुलांनो, मी तुम्हा सर्वांना भांडणासाठी इथे बोलावले नाही, पण मला हे बघायचे आहे की तुमच्यापैकी कोण हे काम चांगले करू शकेल. तेव्हा भांडण थांबवा आणि लाकडाचा हा गठ्ठा मोडून दाखवा. या कामासाठी प्रत्येकाला आळीपाळीने संधी दिली जाईल. असे म्हणत शेतकऱ्याने आधी लाकडाचा गठ्ठा त्याच्या मोठ्या मुलाकडे दिला. मोठ्या मुलाने बंडल तोडण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो तोडण्यात अपयश झाला. अयशस्वी झाल्यानंतर मोठ्या मुलाने लाकडाचा गठ्ठा दुसऱ्या मुलाच्या हातात दिला आणि म्हणाला की भाऊ, मी प्रयत्न केला आहे, मी हे काम करू शकणार नाही, तूच आता प्रयत्न करून बघ ' यावेळी दुसऱ्या मुलाच्या हातात लाकडाचा गठ्ठा होता. तो गठ्ठा तोडण्याचाही त्याने पुरेपूर प्रयत्न केला, पण लाकडाचा गठ्ठा तुटला नाही. अयशस्वी झाल्यावर त्यांनी लाकडाचा गठ्ठा तिसऱ्या मुलाला दिला आणि म्हणाला , हे काम खूप अवघड आहे, तू पण प्रयत्न कर. यावेळी तिसऱ्या मुलानेही पुरेपूर प्रयत्न केले, पण लाकडाचा बंडल खूप जाड होता. या कारणास्तव, अधिक बळ लागू करूनही तो तोडू शकला नाही. खूप मेहनत करूनही काही झाले नाही तेव्हा शेवटी धाकट्या मुलाच्या हातात लाकडाचा गठ्ठा दिला. आता आपली ताकत आजमावण्याची पाळी धाकट्या मुलाची होती. त्यानेही खूप प्रयत्न केले, पण सर्व भावांप्रमाणे त्यालाही तो लाकडाचा गठ्ठा तोडण्यात यश आले नाही. शेवटी त्याने लाकडाचा गठ्ठा जमिनीवर टाकला आणि म्हणाला- 'बाबा, हे काम शक्य नाही.' शेतकरी हसला आणि म्हणाला, लमुलांनो, आता तुम्ही हा गठ्ठा उघडा, आणि त्यातली लाकडे वेगळी करा आणि मग तोडण्याचा प्रयत्न करा.' चार भावांनी तेच केले. यावेळी प्रत्येकाने हातात एक-एक काठी घेतली आणि सहज तोडली. शेतकरी म्हणाला - 'मुलांनो, तुम्ही चौघेही या लाकडांसारखे आहात. जोपर्यंत तुम्ही या काठ्यांसारखे एकत्र राहाल, तोपर्यंत कोणीही तुमचे नुकसान करू शकणार नाही, परंतु जर तुम्ही एकमेकांसोबत भांडत राहिलात तर तुम्ही या एकट्या काठ्यांप्रमाणे सहज तुटून जाल.' शेतकऱ्याचे म्हणणे ऐकून आता सर्व मुलांना वडिलांना काय समजावायचे आहे ते समजले. सर्व मुलांनी त्यांच्या चुकांसाठी माफी मागितली आणि वचन दिले की ते आयुष्यात पुन्हा कधीही एकमेकांशी भांडणार नाहीत.

**तात्पर्य** - एकात्मतेतील सामर्थ्य ही कथा आपल्याला सांगते की एकता ही सर्वात मोठी शक्ती आहे. जर आपण आपसात एकरूप राहिलो तर कितीही अडचणी आल्या तरी त्याचा सहज सामना करता येतो. दुसरीकडे, जर आपण एकमेकांशी भांडत राहिलो आणि वेगळे राहिलो, तर छोटी समस्याही आयुष्यावर ओझे बनू शकते.

## रेसिपी

# स्वीट कॉर्न सूप



**'स्वीट कॉर्न सूप'साठी लागणारा साहीत्य:**

- २ कप स्वीट कॉर्नचे दाणे (कच्चे)
- १ टीस्पून बटर
- २ ते ३ टेस्पून भोपळी मिरची, मध्यम चिरून
- २ ते ३ टेस्पून गाजर, मध्यम चिरून
- २ टेस्पून कोबी, चिरून
- १ टेस्पून कॉर्न फ्लोअर
- १/४ टीस्पून पांढरी मिरपूड
- चवीपुरते मीठ
- २ टीस्पून साखर
- पाती कांदा, फक्त हिरवा भाग सजावटीसाठी

**'स्वीट कॉर्न सूप'साठी लागणारा साहीत्य:**

- स्वीट कॉर्न प्रेशर कुकरमध्ये ४ शिट्ट्या करून शिजवून घ्या.
- २ पैकी दीड वाट्या स्वीट कॉर्न मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. बारीक भोकाच्या चाळणीवर गाळून घ्या.
- कढई गरम करून त्यात बटर घालावे. भोपळी मिरची, गाजर, कोबी घालून मिनिटभर परतावे. आता गळलेली प्युरी आणि उरलेले १/२ कप अख्खे दाणे घालावे. तसेच साधारण अडीच पाणी घाला.
- लहान वाटीत कॉर्न फ्लोअर आणि १/२ कप पाणी घालून मिश्रण तयार करावे. सूपला उकळी आली की त्यात दाटसरपणासाठी कॉर्न फ्लोअरचे मिश्रण घालावे.
- मीठ, साखर आणि मिरपूड घालावी. मध्यम आचेवर मिनिटभर उकळी काढावी.
- सूप सर्व्हिंग बोलमध्ये वाढावे. कांद्याची पात बारीक चिरून सजवावे. गरमच सर्व्ह करावे.

**टीपा:**

- भाज्या ऐच्छिक आहेत. पण नुसते स्वीट कॉर्न सूपऐवजी भाज्या चांगल्या लागतात.
- रेडीमेड क्रीम स्टाईल कॉर्न वापरले तर सूप जास्त छान होते. १ कॅन वापरल्यास त्यात १/२ कप उकडलेले अख्खे कॉर्नचे दाणे आणि गरजेनुसार पाणी (साधारण दीड कप) वापरावे. कॉर्न फ्लोअर कमी वापरावे.

## 'मराठी एकीकरण' सुडोकू - ३३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 8 | | 2 |
| | | | | 9 | | 4 | | |
| | 2 | | | | | | 9 | |
| | | | 6 | 1 | | 9 | | |
| | 6 | 8 | 7 | | 9 | | | |
| | | | 2 | | | 5 | | 3 |
| 7 | | | | | | | | 5 |
| | 1 | 6 | | 8 | 7 | | | |
| 3 | | | | | | 2 | 8 | |


- रिक्त स्थान भरा जेणेकरून प्रत्येक पंक्ती, प्रत्येक स्तंभ आणि नऊ ३x३ ग्रिड्समध्ये प्रत्येक संख्या १ ते ९ मधील प्रत्येक घटकाचे एक उदाहरण असेल.
- प्रत्येक ओळ १ ते ९ अंकांमध्ये भरली पाहिजे.
- प्रत्येक आडव्या आणि उभ्या पंक्तीत कोणत्याही आकड्याचे पुनरावृत्ती न होण्याची काळजी घ्या.
- कोडे तीन स्तरांच्या अडचणीत विभागले आहेत.
- रकान्यातील अंक हटवू शकत नाही.
- कोड्याचे फक्त एकच उत्तर आहे.

## उत्तर 'मराठी एकीकरण' सुडोकू - ३३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 5 | 1 | 7 | 4 | 9 | 3 | 6 |
| 9 | 7 | 4 | 8 | 3 | 6 | 2 | 1 | 5 |
| 1 | 3 | 6 | 5 | 9 | 2 | 4 | 7 | 8 |
| 2 | 5 | 7 | 9 | 4 | 8 | 3 | 6 | 1 |
| 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 5 | 9 | 2 |
| 6 | 9 | 1 | 2 | 5 | 3 | 7 | 8 | 4 |
| 7 | 6 | 2 | 3 | 1 | 5 | 8 | 4 | 9 |
| 4 | 8 | 9 | 6 | 2 | 7 | 1 | 5 | 3 |
| 5 | 1 | 3 | 4 | 8 | 9 | 6 | 2 | 7 |

## कविता

### या रे या... सारे या...



या रे याङ्ग सारे याङ्ग
गप्पागोष्टी मारुयाङ्ग

या रे याङ्ग सारे याङ्ग
खोड्या आपण काढूयाङ्ग

या रे याङ्ग सारे याङ्ग
पकडा पकडी खेळूयाङ्ग

या रे याङ्ग सारे याङ्ग
पाटीवरती पेन्सिल गिरवूयाङ्ग

या रे याङ्ग सारे याङ्ग
जोरजोरात उड्या आपण मारुयाङ्ग

या रे याङ्ग सारे याङ्ग
मस्तीची शाळा भरवूयाङ्ग

**-कोमल जगताप**

### कसे जगावे...?



"कसे जगावे...?..." प्रश्न एवढा खटकत राही
शरीर माझे, आत्मा माझा झटकत राही

उभा इथे मी आयुष्याच्या तीरावरती..
क्षणाक्षणाची वाळू खाली सटकत राही

शरीर गेले, तरी न त्याची गाथा सरली
जगास अवघ्या सांगत सत्ये भटकत राही

उगाच माझ्या आयुष्याची क्षेमखुशालीङ्ग
विचारून तो येता - जाता हटकत राही..!

कुठे कुणाला दिसला का तो ईश्वर सांगा..
सवाल त्याच्या अस्तित्वाचा लटकत राही..

**-सुरेश भट**

## ०७ जूलै रोजी घडलेल्या ऐतिहासिक घटनांची सूची




**महत्त्वाच्या घटना:**

- १४५६: मृत्यूच्या २५ वर्षांनंतर जोन ऑफ आर्कला निर्दोष ठरवले.
- १५४३: फ्रेन्च सैन्याने लक्झेंबर्गचा ताबा घेतला.
- १७९९: रणजितसिंहच्या सैन्याने लाहोरला वेढा घातला.
- १८५४: कावसजीदावर यांनी मुंबईत कापड गिरणी सुरू केली.
- १८९६: मुंबईच्या फोर्ट भागातील एस्प्लनेड मॅन्शन या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील वॉटसन हॉटेलमध्ये ऑगस्ते लुई या ल्युनिअर बंधूंनी भारतात पहिल्यांदाच चित्रपट दाखवला.
- १८९८: हवाई बेटांनी अमेरिकेचे सार्वभौमत्व मान्य केले.
- १९१०: पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना.
- १९४१: दुसरे महायुद्ध - अमेरिकन सैन्याचे आइसलँडमधे आगमन झाले.
- १९७८: सॉलोमन बेटांना इंग्लंडकडून स्वातंत्र्य मिळाले.
- १९८५: विम्बल्डन पुरूष एकेरीचे विजेतपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
- १९९८: इन्डिपेन्डन्स चषक तिरंगी क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेविरुद्ध खेळताना सचिन तेंडुलकरने वेस्ट इंडिजच्या डेसमंड हेन्सच्या एकदिवसीय सामन्यातील १७ शतकांची बरोबरी केली. तसेच एकदिवसीय सामन्यातील ७००० धावांचा टप्पा पार केला.
- १८५४: बॉम्बे स्पिनिंग अँड वेअविंग मिल स्थापना.

**जन्मदिवस / जयंती / वाढदिवस:**

- १०५३: जपानी सम्राट शिराकावा यांचा जन्म. (मृत्यू: २४ जुलै ११२९)
- १६५६: शीख धमा$चे आठवे गुरु गुरू हर क्रिशन यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १६६४)
- १८४८: ब्राझीलचा राष्ट्राध्यक्ष फ्रान्सिस्को दि पॉला रॉड्रिगेस आल्वेस यांचा जन्म.
- १९१४: प्रतिभासंपन्न संगीतकार अनिल बिस्वास यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मे २००३)
- १९२३: कथाकार, कादंबरीकार आणि समीक्षक प्रा.लक्ष्मण गणेश जोग यांचा जन्म.
- १९४७: नेपाळ नरेश राजेग्यानेंद्र यांचा जन्म.
- १९४८: चित्रपट रंगभूमीवरील अभिनेत्री पद्मा चव्हाण यांचा जन्म. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९९६)
- १९६२: गायिका पद्म जाफेणाणी यांचा जन्म.
- १९७०: भारतीय क्रिकेटपटू मिस्टर पटेल यांचा जन्म.
- १९७३: भारतीय गायक-गीतकार आणि दिग्दर्शक कैलाश खेर यांचा जन्म.
- १९८१: भारतीय क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी यांचा जन्म.

**मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:**

- १३०७: इंग्लंडचा राजा एडवर्ड पहिला यांचे निधन. (जन्म: १७ जून १२३९)
- १५७२: पोलंडचा राजा सिगिस्मंड दुसरा ऑस्टस यांचे निधन.
- १९३०: स्कॉटिश डॉक्टर शेरलॉक होम्स या गुप्तहेर कथांचे लेखक सर आर्थर कॉनन डॉइल यांचे निधन. (जन्म: २२ मे १८५९)
- १९६५: इस्त्रायलचे दुसरे पंतप्रधान मोशे शॅरेट यांचे निधन.
- १९८२: भारतीय गुरू आणि धार्मिक लेखक बॉन महाराजा यांचे निधन. (जन्म: २३ मार्च १९०१)
- १९९९: भारतीय क्रिकेट खेळाडू एम. एल. जयसिंहा यांचे निधन.

## ‘लक्षवेधी’

### भुयारीमार्गात मृत्यूचे सापळे

**नवी मुंबई,** सायन-पनवेल महामार्गावर उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे डी. वाय. पाटील विद्यापीठ, नेरूळ एसबीआय कॉलनी, उरण फाटा आणि खारघरमधील मार्ग पाण्याखाली गेले असून महामार्ग ओलांडताना पादचाऱ्यांच्या सोयीसाठी उभारलेल्या भुयारी मार्गांतील साचलेल्या पाण्यामुळे अपघाताची शक्यता आहे. सायन-पनवेल महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामाला २०१४ ला सुरुवात झाली. कळंबोली ते मानखुर्द दरम्यानच्या या महामार्गाचे रुंदीकरणाचे २०१६ ला काम पूर्णत्वास आले. पूर्वीच्या दोन पदरी रस्त्याचे रुंदीकरण करताना चौपदरीकरण करण्यात आले. त्यामुळे महामार्गावर धावणाऱ्या वाहनांची संख्या वाढणार असल्याने मार्ग ओलांडण्यासाठी भुयारी मार्गाची संकल्पना राबवण्यात आली. भरधाव वेगातील वाहने रस्त्यावरून धावत असताना रस्ता ओलांडण्यासाठी नेरूळ एलपीजवळ, एसबीआय कॉलनीजवळ, उरण फाटा आणि खारघर येथे भुयारी मार्ग तयार करण्यात आले; परंतु वापराविना पडून असलेल्या भुयारी मार्गांची देखभाल दुरुस्ती झाली नसल्याने अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. विशेष म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाने या महामार्गाकडे दुर्लक्ष केले असल्याने पादचाऱ्यांच्या सोयीसाठी असलेले मार्ग धोकादायक बनले आहेत. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्या कल्याणी गुप्ता यांच्याशी संपर्क केला असता होऊ शकला नाही.

### पानवेलींच्या लोढ्यांमुळे मच्छीमारांची उपासमार

**तुर्भे,** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भरावाचे काम सुरू केल्यापासून खाडी किनाऱ्यावरील मासेमारी संकटात आली आहे. अशातच सध्या खोल समुद्रातील मासेमारी बंद असल्याने खाडीतील मासेमारी केली जात आहे, पण दरवर्षीप्रमाणे यंदाही तळोजा खाडीतून येणाऱ्या रसायनयुक्त पाणी, तसेच पानवेळीच्या लोढ्यांमुळे मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आली आहे. नवी मुंबई विमानतळासाठी खाडी परिसरात भराव केला जात असल्याने तळोजा एमआयडीसीमधील खाडीतून येणाऱ्या पावसाच्या प्रवाहात केमिकल, तसेच पाणवेळींचे नवे संकट दिवाळे गावातील मच्छीमारांवर कोसळले आहे. पूर्वी तळोजा खाडीतून येणाऱ्या पानवेली कोंबडभुजे, तरघर, तसेच पनवेलच्या दिशेकडे पावसाच्या प्रवाहाने जात होत्या. मात्र, आता त्या ठिकाणी भराव टाकण्यात आला असल्याने पानवेली थेट दिवाळे खाडीकिनारी येत आहेत. त्यामुळे भरती काळात खाडीमध्ये मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना याचा फटका बसत आहे. महत्त्वाचे म्हणजे, भरतीवेळी पानवेली पाण्यावर तरंगतात, मात्र भरती संपताच मासेमारीसाठी टाकलेल्या जाळ्यात जाऊन बसत असल्याने जाळे तुटत असल्याने नाहक आर्थिक भुर्दंड बसत आहे. त्यामुळे मासेमारीवरील संकटाने ‘नाक दाबून बुक्क्यांचा मार’ अशी अवस्था ग्रामस्थांची आहे.

### महिनाभरात श्वानदंशाच्या एक हजार घटना

**अलिबाग,** श्वान दंश झाल्यास सरकारी रुग्णालयात उपचार घ्यावे, उपचार न घेतल्यास रेबिजची लागण होण्याची शक्यता असते. दमट वातावरणात रेबिजच्या विषाणूचा जास्त फैलाव होत असल्याने सल्ला पशुवैद्यकीय डॉक्टर देत आहेत. याच दिवसांत कुत्र्यांचा प्रजनन कालावधी सुरू असतो, झुंडीने फिरत असणारे कुत्रे अधिक आक्रमक होतात. गेल्या महिनाभरात श्वानदंशाच्या एक हजार ८५९ घटना रायगड जिल्हात घडल्याची नोंद झाली आहे. जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. पावसाळी हंगामात कुत्रे अधिक आक्रमक होतात. जिल्ह्यात सध्या कोणत्याही नगरपालिका, ग्रामपंचायतीकडून भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण सुरू नाही. निर्बिजीकरणासाठी साधारण दोन हजार रुपये प्रत्येकी खर्च येत असल्याने ग्रामपंचायतींच्या आर्थिक कुवतीबाहेरचा हा खर्च आहे.

## राज्यातील सर्वात मोठ्या बाजार समितीतून मोठी अपडेट, कांदा दराचं चित्र बदललं, काय घडलं?



**■नवी मुंबई।प्रतिनिधी,**

कांदा हा दररोजच्या जेवणात वापरला जातो. मात्र हाच कांदा शेतकऱ्याच्या डोळ्याला अनेक वेळा पाणी आणतो असे सरर्सपणे बोललं जातं. कांदा हे उत्पन्न कमी कालावधीत तयार होणारे असल्यामुळे अनेक शेतकरी कांद्याच्या उत्पन्नाला पसंती देतात, त्यात कांद्याला थोडेफार कमी पाणी असले तरी कांद्याचे उत्पन्न घेता येते, त्यामुळे नगरसह इतर जिल्ह्यात कांद्याचे उत्पन्न चांगले काढले जाते, मात्र गेल्या काही वर्षांपासून हाच कांदा शेतकऱ्यांना रडवताना दिसत होता. कांद्याचे दर स्थिर असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे तर खर्चाचे देखील पैसे निघाले नाहीत, त्यातच वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न कांदा-बटाटा बाजार समितीत गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर स्थिर होते. मात्र, शुक्रवार पासून घाऊक बाजारात कांदा वधारला आहे. कांद्याच्या दरामध्ये होणारी वाढ शेतकऱ्यांना समाधान देणार अस बोललं जातं आहे. कांद्याचे दर स्थिर, अवकाळी पाऊस आणि सद्या होणारा सततचा पाऊस याचा परिणाम कांद्यावर झालेला दिसत आहे, त्यामुळे गेल्या 3 ते ४ दिवसांपासून कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न कांदा-बटाटा बाजार समितीत टोमॅटोसह इतर भाज्या महाग झाल्या आहेत. अशातच सततच्या पावसामुळे बाजारातील आवक कमी झाल्याने कांदा प्रतिकिलो १६ ते २० रुपयांनी विक्री होत आहे. गेल्या काही दिवसांपासून एपीएमसीत कांद्याचे दर स्थिर होते. मात्र, गेले दोन दिवस बाजारात काद्यांची आवक कमी होत असल्याने दरवाढ झाली आहे. अशातच राज्यभरात पावसाचे आगमन झाले असल्याने ठेवणीच्या कांद्याला अधिक मागणी आहे. त्यामुळे साधारणपणे जुलै महिन्यानंतर कांद्याचे दर वधारत असतात. यंदा अवकाळी पावसामुळे साठवणुकीचा कांदादेखील भिजला असल्यामुळे मे महिन्यातच ठेवणीतला कांदा खरेदीकडे ग्राहकांनी पाठ फिरवली होती. अशातच एपीएमसी मार्केटमध्ये फक्त ८७ गाड्यांची आवक झाली आहे. त्यामुळे घाऊक बाजारात काद्यांचे दर प्रतिकिलोला ४ ते ६ रुपयांनी वाढले असून १२-२० रुपयांनी विक्री होत आहे. अनेक शेतकरी हे उन्हाळी कांदा साठवून ठेवतात, कारण उन्हाळी कांद्याना चांगला भाव मिळतो अशी आशा प्रत्येक शेतकऱ्याला असते मात्र अनेक वेळा शेतकऱ्याच्या पदरी निराशाच पडते. मात्र, ह्या वेळी अवकाळी पाऊस आणि सततच्या होणाऱ्या पावसाचा फटका कांद्याला बसला आहे. त्यामुळे बाजारात कांद्याची कमी होणारी आवक पाहता कांद्याचे दर वाढत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. अनेक चाळी मध्ये ठेवलेला कांदा हा पावसामुळे खराब होत असताना कांद्याच्या किंमतींमध्ये वाढ झाली आहे.

## उरण रेल्वे स्थानक पाण्यात बुडाले अंडरग्राउंडमध्ये पाच फूट पाणी



**■उरण।प्रतिनिधी,**

खारकोपर ते उरण ही बहुप्रतिक्षित लोकल सुरू होण्यापूर्वीच उरणच्या स्थानकात अंडरग्राउंडमध्ये पावसामुळे पाणीच पाणी झाले आहे. त्यामुळे ही लोकल सुरू होण्यापूर्वीच या मार्गावरील स्थानकांच्या कामांची पोलखोल झाली आहे. उरणमधील काही तरुणांनी स्थानकात साचलेल्या या पाण्यात आनंद घेतला. तर यापूर्वी महिलांनी लोकल सुरू होण्यासाठी स्थानकात ह्यकब आओगेह्न सारखी गाणी गात लोकल सुरू करण्याची मागणी केली होती.

अशातच उरण लोकल सुरू होण्याची येथील नागरिक वाट पाहत आहेत. त्यातच यासाठी ह्यतारीख पे तारीखह्नही जाहीर झाल्या आहेत. त्याचवेळी पहिल्याच पावसात नव्याने उभारण्यात आलेल्या स्थानकांत चार ते पाच फूट पाणी साचल्याने पावसाळ्यात या स्थानकांची स्थिती काय असणार याचे भविष्यच दिसू लागले आहे.

पावसाळ्याला सुरुवात झाल्यापासून मागील आठवडाभरापासून उरण व द्रोणागिरी ही दोन्ही स्थानके अंधारात आहेत. या संदर्भात रेल्वे विभागाशी संपर्क साधला असता या दोन्ही स्थानकांच्या विजेच्या चाचण्या सुरू असून लवकरच वीजपुरवठा पूर्ववत होईल, अशी माहिती दिली आहे.

## कल्याण-डोंबिवलीत रस्त्यांवर पावसामुळे खड्डे

**■कल्याण।प्रतिनिधी,**

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील शहरी भागांसह २७ गाव ग्रामीण भागातील रस्त्यांवर गेल्या आठवड्यापासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. या खड्ड्यांमुळे वाहनांची गती मंदावली आहे. त्यामुळे शहराच्या काही भागांत वाहन कोंडी होत आहे. जून अखेरपर्यंत पालिकेकडून पावसाळापूर्वीची खड्डे भरणीची कामे सुरू होती. ही कामे सुरू असताना मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. नव्याने खड्डे भरणी केलेल्या रस्त्यांवरील खडी सततच्या वाहनांमुळे रस्त्यावर पसरली आहे. या खडीमुळे दुचाकी घसरण्याचा धोका वाढला आहे.

हे खड्डे पावसाने उघडीप दिल्यानंतर पालिकेच्या ठेकेदाराने भरले नाहीत तर खड्ड्यांचे आकार वाढून पादचारी, वाहन चालकांना त्याचा त्रास होण्याची शक्यता आहे. शहाड पुलावर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांच्या भागातून वाहन चालक संथगतीने वाहने नेतात. त्यामुळे शहाड पुलावर वाहन कोंडी दिसते. पाऊस सुरू असल्याने हे खड्डे पाण्याने भरतात. अनेक वेळा या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने दुचाकी स्वार या खड्ड्यांमध्ये पडतात, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

वाहतूक पोलिसांनी विटा, खडी टाकून हे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला होता. सततच्या वाहनांच्या वर्दळीमुळे खडी दोन तासांत बाहेर येते, असे पोलिसांनी सांगितले. डोंबिवली पश्चिमेतील गणेशनगर, राजूनगर, देवीचापाडा रस्ता, आयरे रस्ता, मानपाडा रस्ता,



एमआयडीसीमधील जुने रस्ते, कल्याण चिंचपाडा, खेडगोळवली, काटेमानिवली, २७ गावांमधील पिसवली, आडिवली ढोकळी, मलंग रस्ता, सोनारपाडा, वसार भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील शहाड उड्डाण पूल, पत्रीपूल, दुगार्डी पूल, गांधारे पूल, ठाकुर्ली पूल, कोपर पूल याठिकाणी खड्डे पडणार नाहीत. पडले तरी हद्दीचा आणि नियंत्रक संस्थेचा वाद निर्माण न करता पालिकेने आपल्या हद्दीतील प्रवासी, वाहन चालकांना त्रास नको म्हणून ते खड्डे तात्काळ बुजवावेत, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. गेल्या वर्षी तत्कालीन शहर अभियंता सपना कोळी यांच्या ढिसाळ नियोजनामुळे कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील रस्त्यांची चाळण झाली होती. हे खड्डे बुजविताना पालिकेकडून अक्षम्य दिरंगाई झाल्याने नागरिकांनी पालिकेला दोन महिने खड्डे विषयावरून लक्ष्य केले होते. या टिकेपासून वाचण्यासाठी पालिकेने खड्डे भरणीवर भर देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## रेल्वे स्थानकातील उद्वाहन बंद... प्रवाशांचे हाल



**■डोंबिवली।प्रतिनिधी,**

गेल्या १५ दिवसांपासून डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे जिन्याकडे सरकणारे उद्वाहन बंद असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. वृद्ध, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला यांची सर्वाधिक कुचंबणा होत आहे. उद्वाहन सुरू करा म्हणून अनेक प्रवाशांनी स्थानिक रेल्वे अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत. त्याची दखल घेण्यात येत नाही, असे प्रवाशांनी सांगितले. डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळ फलाट क्रमांक पाचच्या बाजूने पाटकर रस्त्याच्या एका बाजूला प्रवाशांना स्कायवॉकवर जाण्यासाठी, रेल्वे स्थानकात जाण्यासाठी कल्याण दिशेने एक उद्वाहन आहे. एकावेळी १० प्रवासी या उद्वाहनाने येजा करतात. गेल्या आठवड्यापासून पडत असलेल्या मुसळधार पावसाचे पाणी उद्वाहनाच्या तळाला गेल्याने तेथील विद्युत यंत्रणा बंद पडली आहे. पाटकर रस्ता, नेहरू रस्ता, डॉ. रॉथ रस्ता भागात मुसळधार पाऊस पडला की या भागातील भुयारी गटार अरुंद असल्याने त्याची सांडपाणी वाहून नेण्याची क्षमता कमी आहे. अनेक वर्षे पालिकेकडून या भुयारी गटाराची डागडुजी त्याची क्षमता वाढविण्याचे काम केले नाही. अर्धा ते एक तास मुसळधार पाऊस पडला की डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागात दोन ते तीन फूट पाणी तुंबते. हे पाणी परिसरातील व्यापारी गाळे, दुकानांमध्ये जाते. याच रस्त्यावर रेल्वेचे उद्वाहन आहे. हे उद्वाहन मुसळधार पावसात एक ते दोन फूट पाण्यात जाते. यामधील विद्युत यंत्रणा ठप्प पडते. मागील दोन वर्षापासून प्रवासी हा अनुभव पावसाळ्यात घेतात. गेल्या १५ दिवसांपासून विद्युत यंत्रणा बंद असल्याने त्याची दुरुस्ती रेल्वेकडून केली जात नसल्याने उद्वाहन बंद असल्याचे कळते. आम्ही या बंद उद्वाहनाचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविला आहे. ही कामे वरिष्ठ पातळीवरून केली जातात, असे एका रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले. उद्वाहन बंद असल्याने त्याचा गैरफायदा फेरीवाले घेत आहेत. या उद्वाहनाच्या समोर फेरीवाले ठाण मांडून बसतात. प्रवाशांना जिन्यांची चढउतर करून मग रेल्वे स्थानकात किंवा डोंबिवली पश्चिमेत जावे लागते. अनेक ज्येष्ठ नागरिकांना जिने चढण्याचा त्रास होतो म्हणून नेहरू रस्त्याने ठाकुर्ली उड्डाण पुलावरून पायी पश्चिम भागात जातात, असे एका ज्येष्ठ नागरिकाने सांगितले.

## ठाण्यात महापालिकेच्या वतीने मोफत फिरता दवाखाना



**■बातमी/लेख। विनोद मेढे,**

ठाणे महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या सोईसाठी मोफत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला आहे. या फिरत्या दवाखान्यामध्ये डॉक्टर, परिचारिका उपलब्ध असणार आहे. फिरत्या दवाखान्यामुळे रुग्णांवर प्राथमिक उपचार करता येणार आहे. तसेच दवाखान्यामध्ये नागरिकांना रक्ताच्या प्राथमिक चाचण्या करता येणे शक्य होईल. नागरिकांना त्यांच्या परिसरात महापालिकेच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिकेने फिरता दवाखाना सुरू केला आहे. रुग्णवाहिकांमध्ये विविध अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा तयार करून हा फिरता दवाखाना तयार करण्यात आला आहे. दवाखान्याचे उद्घाटन बुधवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त उमेश बिरारी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी दररोज सकाळी ८.३० ते सायंकाळी ४.३० या वेळेत हा मोफत दवाखाना उपलब्ध असणार आहे. फिरत्या दवाखान्यामध्ये डॉक्टर, परिचारिका उपलब्ध असतील. दवाखान्यामध्ये नागरिकांना रक्ताच्या प्राथमिक चाचण्या करता येणे शक्य होईल. तसेच रुग्णांना प्राथमिक उपचार उपलब्ध होणार आहेत. हा दवाखाना शहरातील झोपडपट्टी परिसरात फिरणार असल्यामुळे नागरिकांना याचा फायदा होणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले.

## नवी मुंबईत एकाच दिवशी१ मुलगा, ३ मुलींचे अपहरण

**■नवी मुंबई।प्रतिनिधी,**

नवी मुंबईतील रबाळे पोलीस ठाणे हद्दीत एकाच दिवशी वेगवेगळ्या घटनेत चार जणाचे अपहरण झाल्या प्रकरणी अनोळखी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मध्ये एका मुलाचा आणि तीन मुलींचा समावेश आहे. हि चौघेही अल्पवयीन असल्याने अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास रबाळे पोलीस करीत आहेत.

विनोद वाकोडे यांचा पंधरा वर्षीय मुलगा विपुल हा २ तारखेला सकाळी १० वाजता विठ्ठल क्लासेस मध्ये नियमित शिकवणीसाठी गेला होता. मात्र तो परत आलाच नाही. या बाबत त्याचे वडील विनोद यांनी क्लासेस मध्ये चौकशी केली असता तो आज आलाच नाही अशी माहिती समोर आली . त्यामुळे अज्ञात व्यक्तीने फूस लावून अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऐरोली सेक्टर २ येथे पती, पत्नी तीन मुली आणि एक मुलगा असे कुटुंब राहते. मुलगा व पती हे फळ व्यापारी असून ते नेहमी प्रमाणे सकाळीच बाहेर गेले. तर फियार्दी या संध्याकाळी साडे पाचच्या सुमारास भाजी आणण्यासाठी घराबाहेर पडल्या. मात्र आपल्यावर त्यांची सोळा वर्षीय मुलगी आढळून आली नाही. त्यांनी त्यांच्या इतर दोन मुलींना विचारणा केली असता बाहेर गेलेली मुलगी वेफर्स आणण्यास गेली आहे. असे सांगण्यात आले मात्र रात्री उशिरा पर्यंत घरी न आल्याने शेवटी अपरात्री या बाबत रबाळे पोलीस ठाण्यात मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

ऐरोली गावात एका किराणा दुकानदाराच्या मुलीचेही अपहरण झाल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन तारखेला अपहृत मुलगी आणि तिची आई दोघीही स्वतःच्या किराणा दुकानात आल्या होत्या. जाताना केवळ आई घरी गेली तर मुलगी रात्री अकरा पर्यंत वडिलांच्या सोबत दुकानातच होती. दुकान बंद करण्याची वेळ होत आल्याने वडिलांनी मुलीस घरी पाठवले व काही वेळाने स्वतः पण घरी निघाले. तेवढ्यात त्यांच्या पत्नीचा फोन आला कि मुलगी घरी आलीच नाही. त्यामुळे नातेवाईक, शेजारी, परिचित लोकांच्या कडे तिच्या विषयी चौकशी केली मात्र काहीच शोध न लागल्याने रात्री उशिरा तिच्या अपहरण झाल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणात नोसिल नाका येथे बिगारी कामगार महिलेची मुलगी आयआयटीचे शुल्क भरण्यास गेली ते परत आलीच नाही. २ तारखेला अपहृत मुलीची आई नेहमी प्रमाणे काम करण्यास बाहेर गेली होती. दुपारी साडे बारा वाजता तिने मुलीस कुठे आहे वैगरे चौकशी साठी फोन केला होता. तिनेही मी परत येत आहे असे सांगितले. हाच तिच्याशी झालेला शेवटचा संवाद होता. रात्री पर्यंत मुलगी घरी न आल्याने शेवटी रबाळे पोलीस ठाण्यात तिच्या अपहरण बाबत रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## शाळेच्या उपमुख्याध्यापिकेने भाजप आमदारांनाच दिला दम



**■ठाणे।प्रतिनिधी,**

उल्हासनगरच्या न्यू इंग्लिश हायस्कूल शाळेने यावर्षी ३ पट फी वाढ केल्याने पालक वर्ग चिंतेत आहे. त्यांनी याप्रकरणाची भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्याकडे तक्रार केली आहे. यानंतर आमदार गायकवाड यांनी या शाळेच्या प्रशासनाची भेट घेत त्यांना याबाबत विचारणा करण्याचा प्रयत्न केला. मात्र शाळेत गेलेल्या आमदारांना उपमुख्याध्यापिकांनी तुमच्यात हिंमत नाही का एकट्याने बोलण्याची असा दम दिला.

आमदार आणि उपमुख्याध्यापिकांमध्ये झालेल्या वादाचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मंगळवारी घडलेल्या घटनेचा हा व्हिडिओ असल्याचे बोलले जात आहे. या वेळेत आमदार गायकवाड यांच्यासोबत काही पालक उपस्थित होते. यावेळी शाळेच्या उपमुख्याध्यापिका यांनी तुमच्यासोबत आलेल्यांना बाहेर पाठवा. तुमच्या एकट्यामध्ये बोलण्याची हिंमत नाही, का असा दम चक्क भाजप आमदारांनाच दिला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी या उपमुख्याध्यापिकेला चांगलेच धारेवर धरत खडसावलं आहे.

## पती-पत्नीकडून गुंतवणूकदारांची अडीच कोटींची फसवणूक

**■डोंबिवली।प्रतिनिधी,**

डोंबिवली पश्चिमेतील जयहिंद कॉलनी भागात राहत असलेल्या एका पती-पत्नीने पुणे, मुंबई, डोंबिवली परिसरातील १४ गुंतवणूकदारांची वाढीव व्याजाचे आमिष दाखवून दोन कोटी ५० लाख रुपयांची फसवणूक केली आहे. अमोल कृष्णा डोंगरीकर, पत्नी अनन्या (रा. यमुना छाया सोसायटी, घनश्याम गुप्ते रस्ता, जयहिंद कॉलनी, डोंबिवली) अशी आरोपींची नावे आहेत. मुंबईतील चेंबूर येथे राहणारे ओमप्रकाश सरोया (६५) या सेवानिवृत्ताच्या तक्रारीवरून विष्णुनगर पोलिसांनी डोंगरीकर दाम्पत्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. मागील पाच वर्षांच्या काळात गुंतवणूकदारांनी डोंगरीकर दाम्पत्याच्या एमएमव्ही कन्सलटन्ट मेघा इंडिया कंपनीत ५० हजार ते ४० लाख रुपयांपर्यंत रकमा गुंतविल्या आहेत. या रकमांवर वाढीव व्याजाचे आमिष डोंगरीकर दाम्पत्याने गुंतवणूकदारांना दाखविले होते.

पोलिसांनी सांगितले, तक्रारदार ओमप्रकाश सरोया यांचा विश्वास संपादन करून डोंगरीकर यांनी त्यांना त्यांच्या गुंतवणूक कंपनीत २५ लाख रुपये गुंतवणूक करण्यास सांगितले. दरमहा २५ हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखविले. सुरुवातीला काही महिने अशाप्रकारे व्याज गुंतवणूकदारांच्या बँक खात्यावर जमा होत गेले. त्यानंतर ओमप्रकाश यांच्या बँक खात्यात व्याज जमा होणे बंद झाले. असाच अनुभव इतर १३ गुंतवणूकदारांना आला. वाढीव व्याज देता येत नसेल तर मूळ रक्कम परत करा म्हणून ओमप्रकाश आणि इतर गुंतवणूकदारांनी डोंगरीकर दाम्पत्याकडे तगादा लावला. विविध कारणे देऊन ते रक्कम परत करण्यास टाळाटाळ करू लागले.

## चिरनेरचा चांदीयली आदिवासी पाडा अंधारात

**■उरण।प्रतिनिधी,**

गव्हाण ते चिरनेर या मुख्य मार्गा पासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या चांदीयली आदिवासी पाडा अंधारात आहे. येथे वीज पुरवठा करावा म्हणून सतत दोन वर्ष महावितरण कंपनी कडे पाठपुरावा करूनही वीज जोडली जात नसल्याने येथील आदिवासींनी संताप व्यक्त केला आहे.

तर काही दिवसांपूर्वी पावसामुळे याच पाड्यावरील एका घराचे नुकसान झाले आहे. उरण तालुक्यातील बहुतांशी परिसर हा विविध उद्योग आणि व्यावसायिक कारणाने रात्रीच्या वेळी विजेच्या प्रकाशात नाहून निघत आहे. याच प्रकाशाच्या झगमगाटात शेजारी वसलेली ७५ नागरीकांची आदिवासी वस्ती अंधारात आहे.

सर्वत्र स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असतांना आजही उरण सारख्या विकसनशील तालुक्यात काही पावलांवर असलेल्या आदिवासी पाड्यावर रस्ते, पाणी, वीज ,शाळा, शौचालय यासारख्या मूलभूत सुविधा नागरी नसल्याने येथील नागरीकांना अंधारासह अनेक समस्यांना तोंड देत जीवन जगावे लागते आहे.

## केडीएमटीच्या बसमधून प्रवाशाच्या बटव्याची चोरी

**■कल्याण।प्रतिनिधी,**

येथील पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील कल्याण डोंबिवली पालिका परिवहन उपक्रमाच्या बसमधून भुरट्या चोराने एका प्रवाशाची नजर चुकवून त्याच्या जवळील २९ हजार रुपयांचा ऐवज असलेला पैशाचा बटवा चोरून नेला. सोमवारी दुपारी ही घटना घडली. मिथिलेश बारगल (६२) हे सेवानिवृत्त आहेत. सोमवारी दुपारी ते कल्याणमध्ये आले होते. ते कल्याण पश्चिमेतील मॅक्सी ग्राउंडजवळील एका संकुलात राहतात. कामे उरकल्यानंतर ते



पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील दीपक हॉटेलजवळील केडीएमटीच्या बस थांब्यावर गेले. आंबिवलीकडे जाणाऱ्या बसमध्ये बसले. बसमध्ये गर्दी असल्याने त्यांनी सोने, चांदी, पैशांचा बटवा हाताच्या काखेत अडकून ठेवला होता. दुपारची वेळ असताना भुरट्या चोराने तक्रारदार मिथिलेश यांना काही कळू न देता त्यांच्या काखेतील २९ हजार ७०० रुपये किमतीचा ऐवज असलेला बटवा हळूच काढून घेतला. बसमधून उतरून पळून गेला. मिथिलेश यांनी तिकिटासाठी पैसे काढण्यासाठी बटवा पाहिला तेव्हा जवळ बटवा नसल्याचे दिसले. त्यांनी बसमध्ये, खाली उतरून पाहिले पण बटवा नव्हता. भुरट्या चोराने बटवा लंपास केल्याचा अंदाज आल्याने त्यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com